ISSN (Print) : Applied...

जीवन शिक्षण
फेब्रुवारी २०२३
किंमत रु. ३०/-
पृष्ठे ४४ वर्ष : ६७
अंक : ११ पुणे.

# जीवन शिक्षण

Jeevan Shikshan
February 2023
Price ₹30
Pages 44 Vol. : 67
Issue : 11 Pune.



## मराठी भाषा गौरव दिन

२७ फेब्रुवारी



लाभले अम्हास भाग्य
बोलतो मराठी ।
जाहलो खरेच धन्य
ऐकतो मराठी ।

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# छत्रपती शिवाजी महाराज





## जयंती निमित्त विनम्र अभिवादन!



# जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**वर्ष ६७** **फेब्रुवारी २०२३** **अंक ११ वा**



❖ **प्रवर्तक : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन**

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.) — **अध्यक्ष**
संचालक तथा संपादक

**रमाकांत काठमोरे,** — **कार्यकारी संपादक**
सहसंचालक

**डॉ. नेहा बेलसरे** — **सहसंपादक**
प्राचार्य, आय.टी. व प्रसारमाध्यम आणि
सा. शास्त्रे व कला-क्रीडा

**डॉ. कमलादेवी आवटे,** — **सदस्य**
प्राचार्य, भाषा आणि समन्वय

**डॉ. शोभा खंदारे,** प्राचार्य, जि. शि. व प्र. सं., पुणे. — **सदस्य**

**राजेंद्र शिंदे,** सहा. संचालक, लेखा — **सदस्य**

**रत्नप्रभा भालेराव,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

**सचिन चव्हाण,** वरिष्ठ अधिव्याख्याता — **सदस्य**

❖ **अरुण सांगोलकर,** वरिष्ठ अधिव्याख्याता तथा उपविभाग प्रमुख (प्रसारमाध्यम) — **सदस्य सचिव**

❖ **निर्मिती सहायक :**
सलिल वाघमारे, अधीक्षक, प्रसारमाध्यम

❖ **संपादन मंडळ :**
माधव राजगुरू,
नंदा कुलकर्णी,
श्रीकांत चौगुले



❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :** ५७,२५०

❖ **मूल्य : रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/-**


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| ❖ संपादकीय | - | ४ |
| ❖ मराठी भाषा गौरव दिन | प्रा. महेश अलिगावे | ५ |
| ❖ वाचनातील आनंद | डॉ. दिलीप गरुड | ७ |
| ❖ शुद्धलेखन व हस्ताक्षर एकाच नाण्याच्या दोन बाजू | अरुण धुमाळ | ९ |
| ❖ शब्दांतील पहिल्या, अनुस्वारयुक्त, विसर्गयुक्त आणि जोडाक्षरापूर्वीच्या अक्षरांचे लेखन | सलिल वाघमारे | १२ |
| ❖ Reading Comprehension with Fluency-A Global Scenario | Arun Sangolkar | १४ |
| ❖ राष्ट्रीय विज्ञान दिन | डॉ. सखाराम शिंदे | २२ |
| ❖ राज्यस्तरीय इंग्रजी भाषा चर्चासत्र (Symposium) | डॉ. विशाल तायडे | २४ |
| ❖ शाळेच्या सहलीतील सजगता | डॉ. गोविंद नांदेडे | २७ |
| ❖ 'अमेरिका' - एक रम्य अनुभव | डॉ. लतिका भानुशाली | २९ |
| ❖ निपुण भारत मिशन : विद्यार्थ्यांना प्रगत व निपुण करणारे धोरण | स्वाती अहिरे | ३७ |
| ❖ शतायुषी 'फुलपाखरू'चा करूया शैक्षणिक महोत्सव | पी. एम. काळे | ४१ |



**पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
**दूरध्वनी :** ०२०-२४४८८३८२ **फॅक्स नं. :** ०२०-२४४७७०९०. **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in



***या अंकातील लेखांमधून व्यक्त झालेल्या विचारांशी किंवा मतांशी जीवन शिक्षण संपादकीय मंडळ सहमत असेलच असे नाही.***

# संपादकीय ....



मित्रांनो,

फेब्रुवारी महिना हा तसा परीक्षांच्या पूर्वतयारीचा महिना असतो. यासाठी विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांची लगबग सुरू असते. मात्र या महिन्यामध्ये काही महत्त्वाचे दिवसही आपण साजरे करीत असतो; जसे की, १९ फेब्रुवारी हा छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्मदिवस, २७ फेब्रुवारी हा मराठी साहित्याचा मानदंड, ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिक वि. वा. शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस आपण 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून, तर २८ फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा करतो.

प्रकाशाच्या विकिरणाबद्दलच्या संशोधनासाठी (रामन परिणाम) १९३१ साली चंद्रशेखर वेंकट रमण यांना 'नोबेल' पारितोषिक मिळाले. श्री. रामन यांचे हे संशोधन २८ फेब्रुवारी रोजी प्रसिद्धीस दिले होते, त्यामुळे आपण २८ फेब्रुवारी हा दिवस 'राष्ट्रीय विज्ञान दिन' म्हणून साजरा करतो. विज्ञानाच्या साहाय्याने मानवाने विविध शोध लावले, जसे अतिसूक्ष्म जीवांचे शोध लावले आहेत, तसेच आपल्या सूर्यमालेबरोबरच इतर सूर्यमालेतील ग्रहांचेदेखील शोध लावले आहेत. संगणक आणि आंतरजालाच्या शोधानंतर सर्व जग जोडले गेले आणि आता जग म्हणजे 'Global Village' झाले आहे. आपण क्षणार्धात कोणतीही माहिती प्राप्त करून घेऊ शकतो. पृथ्वीवरील कोणत्याही देशातील व्यक्तीशी बोलू शकतो, एवढेच नाही तर व्हिडिओ कॉल करून प्रत्यक्ष समोरासमोर बोलण्याचा अनुभव घेऊ शकतो.

आपल्या संविधानातील मूलभूत कर्तव्यांमध्ये (Fundamental Duties) 'विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन, मानवतावाद आणि शोधकबुद्धी यांचा विकास करणे,' या कर्तव्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन रुजवणे आवश्यक आहे. निसर्गातील दैनंदिन घटनांमागील विज्ञान विद्यार्थ्यांना समजावून सांगितल्यास अनेक गैरसमज दूर होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, मराठी शुद्ध लिहिणे, वाचनवेग व आकलनक्षमता वाढवणे यासाठी शिक्षकांनी सतत प्रयत्नशील असायला हवे.

फेब्रुवारी २०२३ च्या अंकामध्ये समयोचित विविध विषयांवरील लेखांचा समावेश करून अंक परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी भाषा गौरव दिन – प्रा. महेश अलिगावे, वाचनातील आनंद – डॉ. दिलीप गरुड, मराठी शुद्धलेखन व हस्ताक्षर– श्री. अरुण धुमाळ, मराठी शुद्धलेखन – श्री. सलिल वाघमारे, Reading Comprehension with Fluency - A Global Scenario - श्री. अरुण सांगोलकर, इंग्रजी भाषा चर्चासत्र – डॉ. विशाल तायडे या भाषेसंबंधी लेखांचा समावेश करण्याबरोबरच, राष्ट्रीय विज्ञान दिन – डॉ. सखाराम शिंदे, शाळेच्या सहलीतील सजगता – डॉ. गोविंद नांदेडे, अमेरिका – एक रम्य अनुभव – डॉ. लतिका भानुशाली, निपुण भारत मिशन – श्रीम. स्वाती अहिरे, शतायुषी 'फुलपाखरू' – पी. एम. काळे याही अभ्यासपूर्ण लेखांचा समावेश केलेला आहे. हे सर्वच लेख विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यासाठी अत्यंत वाचनीय आहेत.

छत्रपती शिवाजी महाराज, वि. वा. शिरवाडकर यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन. शिवजयंतीच्या, मराठी भाषा गौरव दिनाच्या व राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या आपणां सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**कौस्तुभ दिवेगावकर** (भा.प्र.से.)
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे
तथा
संपादक, जीवन शिक्षण

# मराठी भाषा गौरव दिन

**प्रा. महेश अलिगावे**
सहा. शिक्षक आणि प्र. प्राचार्य
अध्यापक विद्यालय, एखतपूर
ता. सांगोला, जि. सोलापूर.

*वि. वा. शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रज यांच्या स्मरणार्थ, त्यांच्या जन्मदिवशी म्हणजे २७ फेब्रुवारी रोजी 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा केला जातो. या निमित्ताने कुसुमाग्रजांविषयी आणि त्यांनी लिहिलेल्या एकूण साहित्याविषयी प्रस्तुत लेखात माहिती देण्यात आली आहे.*

महाराष्ट्राच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत, मराठी भाषेवर चार दशकांपेक्षा जास्त काळ अधिराज्य गाजवणारे श्रेष्ठ प्रतिभावंत कवी, कथाकार, नाटककार, लघुनिबंधकार, कादंबरीकार आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते वि. वा. शिरवाडकर तथा कवी कुसुमाग्रज यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. २७ फेब्रुवारी हा त्यांचा जन्म दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून महाराष्ट्र शासनाने २१ जानेवारी, २०१३ पासून घोषित केला.

कवी कुसुमाग्रज यांचा जन्म पुणे येथे झाला. त्यांना सहा भाऊ आणि कुसुम नावाची एक बहीण होती. ती त्यांच्यापेक्षा लहान होती. कुसुमचे अग्रज म्हणजे आधीचे, आधी जन्मलेले म्हणून 'कुसुमाग्रज' असे नाव त्यांनी धारण केले. नाशिकच्या कला महाविद्यालयातून त्यांनी बी.ए. पर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी काही काळ चित्रपटासाठी पटकथा लिहिणे, चित्रपटात छोट्या भूमिका करणे इत्यादी कामे केली. पुढे पत्रकारितेच्या निमित्ताने कवी कुसुमाग्रज मुंबईत आले. तिथे त्यांची भेट डॉ. भालेराव यांच्याशी झाली. त्यांनी कुसुमाग्रजांना नाटके लिहिण्यास प्रवृत्त केले. त्यांनी लिहिलेली आनंद, आथेल्लो, एक होती वाघीण, किमयागार, कैकेयी, कौंतेय, जेथे चंद्र उगवत नाही, दिवाणी दावा, दुसरा पेशवा, दूरचे दिवे, देवाचे घर, नटसम्राट, 'ययाती आणि देवयानी', विदूषक, वीज म्हणाली धरतीला ही नाटके अजरामर झाली.

कुसुमाग्रजांना नटसम्राटसाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला (१९७४), तर ययाती आणि देवयानी या संगीत नाटकास आणि वीज म्हणाली धरतीला या नाटकास (१९६६, १९६७ साली) राज्यशासनाचे पुरस्कार मिळाले.

वि. वा. शिरवाडकर यांच्या मते, काव्य म्हणजे माणसाचा भोवतालच्या परिसराशी असलेला संवाद होय. आपल्याला जे जे जाणवले, ते ते दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचवणे ही माणसाची स्वभाविक प्रवृत्ती आहे. १९४२ हे वर्ष त्यांच्या जीवनाला कलाटणी देणारे ठरले. वि. स. खांडेकर यांनी कुसुमाग्रजांचा 'विशाखा' हा कवितासंग्रह स्वखर्चाने प्रकाशित केला. त्याच वेळेस दै. प्रभात वृत्तपत्रात त्यांची ''गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार'' ही महाराष्ट्राला स्फूर्ती देणारी कविता प्रसिद्ध झाली. या कवितेमधून मराठी माणसाच्या मनामध्ये स्फुलिंग पेटविले गेले. इंग्रज पोलिसांनी तर दैनिक प्रभातच्या कार्यालयावर धाड टाकली; परंतु त्यात कुसुमाग्रज हे नाव सापडले नाही, कारण रजिस्टरमध्ये वि. वा. शिरवाडकर हे नाव होते. त्यांनी लिहिलेल्या कविता मराठी लोकांचे स्फूर्तिस्थान बनल्या. अक्षरबाग, चाफा, पांथेय, मराठी माती, महावृक्ष, मुक्तायन, मेघदूत, वादळवेल, विशाखा, श्रावण, समिधा इत्यादी कवितासंग्रह मराठी रसिकांनी अक्षरशः डोक्यावर घेतले. याशिवाय दिवाणी दावा, देवाचे घर, प्रकाशाची दारे, बेत, संघर्ष इत्यादी एकांकिका, तसेच आहे आणि नाही,

एकाकी वारा, बरे झाले देवा, मराठीचिये नगरी, विरामचिन्हे हे त्यांचे लघुनिबंध विशेष गाजले.

आपल्या लेखनातून समाजाच्या सर्व थरातील वास्तवाला भिडण्यासाठी ते नेहमीच आग्रही राहिले. त्यांचे समृद्ध, प्रभावी आणि प्रगल्भ व्यक्तिमत्त्व त्यांच्या साहित्यामध्ये रुजलेले दिसून येते. त्यांच्या कविता एकविसाव्या शतकातील तरुणांनाही दीपस्तंभाप्रमाणे प्रेरणा देणाऱ्या आहेत.

महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचा आदर, कौतुक आपण करतच आहोत. आपले मराठी बांधव ते इतर देशांमधूनही करत आहेत. कुसुमाग्रज तर म्हणतात,

*'माझ्या मराठी मातीचा, लावा ललाटास टिळा*

*हिच्या संगाने जागल्या, दऱ्याखोऱ्यांतील शिळा'*

मराठी भाषेचे वैभव वर्णिताना ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

*'माझा मराठीची बोलू कौतुके।*

*परि अमृतातेहि पैजासी जिंके।*

*ऐसी अक्षरे रसिके। मेळविन।।'*

चालू परिस्थितीमध्ये मराठी भाषेचा अभिमान आणि अस्मिता टिकवण्याची गरज आहे, हे लक्षात घेऊन प्रत्येक मराठी माणसाने हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू असा निश्चय करून 'मराठी भाषा गौरव दिनानिमित्त' मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी झटले पाहिजे.

❑❑❑

## ऊन, वून (घेऊन, सामावून)

- धातूंना – ऊ आणि – ऊन हे प्रत्यय लागून क्रियावाचक शब्द बनतात. मात्र – ऊ, ऊन कधी व – वू, वून कधी वापरावे याबाबत विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम असतो.

  ज्या धातूंमध्ये 'व' नाही त्या धातूंना –ऊ किंवा –ऊन हे प्रत्यय लागताना फक्त ऊ किंवा ऊन येतो.

  उदा., (१) गाणे (कृदन्त) – गा (धातू) – गाऊ, गाऊन

  (२) खाणे (कृदन्त) – खा (धातू)– खाऊ, खाऊन.

  ज्या धातूंमध्ये शेवटी 'व' असेल, त्या धातूंनी ऊ, ऊन हे विभक्तिप्रत्यय जोडताना त्यांची रूपे खालीलप्रमाणे होतात.

  उदा., (१) जेवणे (कृदन्त) जेव (धातू) – जेवू, जेवून

  (२) ठेवणे (कृदन्त) ठेव (धातू) – ठेवू, ठेवणे

**अधिक माहितीसाठी व सरावासाठी खालील उदाहरणे पाहा :**

- जेव–जेवणे–जेवून/जेवू
- खा–खाणे–खाऊन/खाऊ
- ठेव–ठेवणे–ठेवून/ठेवू
- घे–घेणे–घेऊन/घेऊ
- ताव–तावणे–तावून/तावू
- द–देणे–देऊन/देऊ
- धाव–धावणे–धावून/धावू
- पिणे–पी–पिऊन/पिऊ
- पाव–पावणे–पावून/पावू
- भी–भिणे–भिऊन/भिऊ
- रोव–रोवणे–रोवून/रोवू
- ये–येणे–येऊन/येऊ
- लाव–लावणे–लावून/लावू
- ले–लेणे–लेऊन/लेऊ
- गा–गाणे–गाऊन/गाऊ
- चाव–चावणे–चावून/चावू
- हो–होणे–होऊन/होऊ
- शिकव–शिकवणे– शिकवून/शिकवू

**– सलिल वाघमारे**

# वाचनातील आनंद

**डॉ. दिलीप गरुड**
पुणे
भ्रमणध्वनी : ९९६०२५९०८५

*वाचन, लेखन, श्रवण व उपयोजन ही अध्ययन प्रक्रियेतील मूलभूत कौशल्ये आहेत. यातील वाचन या कौशल्याचे महत्त्व या लेखात विशद केले आहे. वाचन ही व्यक्तिमत्त्व समृद्ध करणारी प्रक्रिया आहे. वाचनातून मिळणारा आनंद निर्भेळ असतो. वाचन ही समर्थ आणि संपन्न व्यक्तिमत्त्व घडविणारी प्रक्रिया आहे, हे सांगणारा हा लेख.*

ज्याला लिहायला व वाचायला येते त्याला 'साक्षर' म्हणतात; पण फक्त साक्षर असून चालणार नाही, तर सुशिक्षित असले पाहिजे. त्याची पुढील पायरी म्हणजे सुसंस्कारित होणे. एखादा मुलगा सुसंस्कारित होण्यासाठी त्याचे घरचे वळण चांगले असावे लागते. शाळेमध्येही संस्कार व्हावे लागतात. समाजातील वातावरणही सुदृढ आणि निकोप असावे लागते.

साहित्य, संगीत, वक्तृत्व, क्रीडा, नाट्य, अभिनय अशा विविध कलांच्या माध्यमातून माणसाच्या जीवनाला पैलू पाडले जातात. मला वाटते चांगला माणूस घडण्यासाठी चांगल्या साहित्याचे वाचनही फार आवश्यक आहे. माणूस हा बुद्धिमान प्राणी आहे. माणसाने लिपी शोधून काढली. लिपीतून शब्द साकारले. शब्दांची वाक्ये झाली. वाक्यांतून वेचे तयार झाले. वेच्यांतून पुढे लेख, कथा, नाटक, कांदबऱ्या अवतरल्या. ग्रंथांची निर्मिती झाली. आज बाजारात प्रत्येक भाषेचे लाखो ग्रंथ उपलब्ध आहेत; पण प्रथम ज्यांनी भाषा शोधून काढली, त्यांना विशेष धन्यवाद दिले पाहिजेत; कारण त्यांच्यामुळेच हा सारा वाचनाचा, विचारांचा, प्रबोधनाचा प्रपंच घडला आहे.

बाजारात उपलब्ध असलेले हे विविध भाषांमधील लाखो ग्रंथ म्हणजे अनुभवांच्या राशी आहेत. या अनुभवांच्या राशींमधूनच माणसाला ज्ञान मिळणार आहे; कारण साठ-सत्तर वर्षांच्या मर्यादित आयुष्यात माणूस कितीसे अनुभव घेणार आहे? म्हणून पूर्व पिढीतील लोकांनी जीवनाच्या विविध क्षेत्रांत जे अनुभव घेतले, त्या अनुभवांचे संचित म्हणजे हे ग्रंथ.

असे अनुभवांनी समृद्ध असलेल्या ग्रंथांचे वाचन करताना कितीतरी आनंद मिळतो. हा आनंद खरंतर पैशात मोजता येणार नाही, शब्दांत सांगता येणार नाही. त्याचा आस्वाद ज्याचा त्याने घ्यायचा असतो. शिवाय हा आनंद घरबसल्या मिळतो. आपण आपल्या अभ्यासिकेत एकटेच असावे. आपल्या समोर आपल्या आवडीची व आवडत्या लेखकांची पुस्तके असावीत. या पुस्तकांमध्ये विविधता असावी. अगदी कथा, कविता, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, निबंध वाङ्मय, वैचारिक साहित्य, ललित वाङ्मय, चरित्र, आत्मचरित्र असे सर्व प्रकार असावे. आपल्याला जे पुस्तक वाचावेसे वाटते, ते हाती घ्यावे आणि त्यात तल्लीन व्हावे, यात कितीतरी आनंद आहे. ही पुस्तके वाचताना 'आनंदाचे डोही आनंद तरंग' अशी मनाची अवस्था होते.

लौकिक अर्थाने व्यंकटेश माडगूळकरांचे शिक्षण फार नव्हते; पण त्यांचे वाचन अफाट होते. इंग्रजी वाङ्मयातील कितीतरी कथा, कादंबऱ्या, प्रवासवर्णने, विशेषतः शिकारकथा त्यांनी वाचून काढल्या होत्या.

स्वतः त्यांनी जीवनाचा प्रत्यक्ष दांडगा अनुभव घेतला होता. सारा माणदेश त्यांनी पायाखाली घातला होता. ग्रामजीवनातील पूर्वीचे सवंगडी सोबतीस घेऊन शिकारी केल्या होत्या. त्यांचा सारा जीव माणदेशाच्या मातीत रमला होता. त्यांचे वाचन जसे समृद्ध होते, तसे त्यांचे लेखनही समृद्ध होते. त्यामुळेच त्यांचे साहित्य वाचताना ग्रामीण जीवनाचा अस्सल अनुभव येतो आणि त्यांचे साहित्य वाचण्यात आपण रमून जातो.

प्रत्येकाची वाचनाची आवड भिन्न असते. कोणाला वैचारिक साहित्य आवडते, तर कोणी ललित वाङ्मयात रममाण होतो. कोणी तंत्रज्ञानविषयक साहित्य वाचेल, तर कोणी सर्व प्रकारच्या वाङ्मयाची थोडीथोडी चव चाखेल. काही लोक वृत्तपत्रांशिवाय अवांतर काहीच वाचत नाहीत; तर काही लोक वाचायला काही मिळत नाही; म्हणून वाचत नाहीत आणि काही लोक असे आहेत, की वाचताच येत नसल्यामुळे ते वाचत नाहीत. अशा लोकांचे प्रमाण कमी आहे; पण अजूनही आहे. एवढे मात्र खरे, की वाचनातला आनंद हा अवर्णनीय असतो. वाचत असताना वाचक त्या ग्रंथाशी एकरूप होतो. ती त्याची एक प्रकारची सविकल्प समाधीच असते. तो वाचनात एवढा दंग होतो, की स्वतःचे देहभान विसरून जातो. हे ग्रंथ आपले गुरूच होत. ते जसे आपले गुरू असतात, तसे मित्र, सखेसोबतीही असतात. ग्रंथ आपणाला ज्ञान देतात. विचार करायला लावतात. जगण्याला बळ देतात. कल्पनाशक्तीला वाव देतात. त्यातूनच माणूस कृती करायला उद्युक्त होतो.

स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी खरे म्हणजे प्रत्येकानेच वाचन केले पाहिजे. 'वाचाल तर वाचाल' हा आजचा जीवनमंत्रच झाला आहे. अध्ययन–अध्यापन, संशोधन आणि प्रबोधनाच्या क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्यांनी तर विशेष करून वाचन केले पाहिजे. त्याशिवाय त्या क्षेत्रांत ते टिकूच शकणार नाहीत. जसा एखादा गायक किंवा वादक सतत सराव करतो किंवा रियाज करतो, तसा वाचनाचाही रियाज झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे 'महामानव' होण्यामध्ये जसा 'अन्यायाची चीड' हा घटक महत्त्वाचा होता, तसाच अखंड वाचन हाही घटक महत्त्वाचा होता. त्यांची स्वतःची वैयक्तिक २२,००० एवढी ग्रंथसंपदा होती. त्यात कायदा, अर्थशास्त्र, विविध धर्मग्रंथ, राज्यशास्त्र, शिक्षण, व्यवस्थापन असे कितीतरी प्रकारचे ग्रंथ होते. एवढेच नव्हे, तर या ग्रंथांना व्यवस्थित, क्रमवारीने ठेवण्यासाठी त्यांनी 'राजगृह' नावाची वास्तू खास बांधून घेतली. ग्रंथवाचन, ग्रंथप्रेम, ग्रंथसंग्रह, ग्रंथलेखन यांचे चालतेबोलते उदाहरण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या उदाहरणावरून त्यांची ज्ञानसाधना किती प्रचंड असेल आणि वाचन किती अफाट असेल याची कल्पना करता येते. वाचन हा व्यक्तिमत्त्व विकासाचा फार महत्त्वाचा घटक आहे; म्हणून आवर्जून म्हणावेसे वाटते, आवडीने वाचा, वेळ मिळेल तसे वाचा; पण अवश्य वाचा.

वाचनासाठी फक्त बाहेरच्या ग्रंथालयावर अवलंबून राहू नका, तर स्वतःचा ग्रंथसंग्रह वाढवा. घरी स्वतःची छोटेखानी लायब्ररी निर्माण करा. त्यात आवडीच्या ग्रंथांची भर घाला. त्यासाठी अधूनमधून उत्तमोत्तम ग्रंथांची खरेदी करा. घरामध्ये जशा महागड्या आणि चैनीच्या वस्तू असतात, तसे समृद्ध ग्रंथालयही असू द्या. घरातल्या वस्तू पैशांची श्रीमंती दाखवतील, तर घरातील ग्रंथालय विचारांची श्रीमंती दाखवेल. मिष्टान्नामुळे जिभेची चव पुरवली जाईल, तर पुस्तकांमुळे मनाची सांस्कृतिक भूक भागेल. जगात वावरताना जसे दोन–चार मित्र असतात, तसे ग्रंथांच्यारूपाने अनेक मित्र जमवा. हे मित्र कधी धोका देत नाहीत. ते प्रामाणिक

**(पृष्ठ क्र. ११ वर)**

# शुद्धलेखन व हस्ताक्षर एकाच नाण्याच्या दोन बाजू

**अरुण धुमाळ**
सोलापूर.
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८


*शुद्धलेखन व हस्ताक्षर या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोन्ही बाबींत लेखनविषयक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेला मजकूर सुवाच्य असणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे; कारण लिहिलेला मजकूर वाचता आला, तरच लिहिण्याचे उद्दिष्ट साध्य होईल. या दोन्हींचे विवेचन या लेखात आले आहे.*

आपल्याला बोलायला यायला लागल्यापासून आपली आपल्या मातृभाषेशी ओळख झालेली असते. आपली आई ही आपली मराठी भाषेची पहिली आणि उत्तम शिक्षिका होय. अवतीभोवतीचे वातावरण पाहून, इतरांचे ऐकून, आपणही आपल्या मातृभाषेत बोलायला शिकतो. वाढत्या वयाबरोबर मातृभाषेतील विविध शब्दांचा, वाक्यांचा आपल्याला परिचय होऊ लागतो. त्यानंतर शाळेत, महाविद्यालयात गेल्यावर आपल्यावर भाषेचे संस्कार होऊ लागतात. आपण आपल्या अनुभवांनुसार आणि मातृभाषेच्या नियमांनुसार शुद्ध बोलायला व लिहायला शिकतो. अगदी सुरुवातीला शुद्ध कसे बोलावे किंवा शुद्ध कसे लिहावे हे आपल्याला समजत नाही. अगोदर मातृभाषेचे नियम समजावून घ्यायचे आणि मग त्या नियमांना अनुसरून भाषा शिकायची, असे मातृभाषेच्या संदर्भात होत नाही. बोलताबोलता, कळतनकळत ते नियम आपण स्वीकारत असतो.

याचा अर्थ असा होतो, की आपल्याला शुद्ध-अशुद्ध समजलेले असते. मातृभाषेच्या लेखनाचे नियमही थोडेफार माहीत झालेले असतात, कारण आपण ते लेखनविषयक नियम स्वाभाविकपणे आत्मसात केलेले असतात; फरक इतकाच, की ते नियम आपल्या लक्षात आलेले नसतात. दुसरी बाब अशी, की आपण जितक्या सहजपणे आपल्या मातृभाषेतून बोलू शकतो, तितक्या सहजपणे आपण लिहू शकत नाही. याला काही जण अपवाद असतील, ते आपण सोडून देऊ; पण सर्वांनाच हे शक्य नाही. एखादा शब्द अथवा एखादे वाक्य आपण अचूकपणे उच्चारलेले असतानाही, लिखाण मात्र चुकीचे होऊ शकते. अनेक जण, 'आशीर्वाद' किंवा 'अहिंसा' या शब्दांचा उच्चार बिनचूक करतात, पण लिहिताना ते 'आशिर्वाद', 'आर्शिवाद' किंवा 'अंहिसा', 'अहिसां' अथवा 'सिंह' ऐवजी 'सिंव्ह' असे लिहितात. असे अनेक शब्द आहेत, की त्या शब्दांतील कोणते अक्षर 'ऱ्हस्व' आहे व कोणते 'दीर्घ' आहे? किंवा रफार नेमका कोणत्या अक्षरावर द्यावा हे अनेकांच्या लक्षात येत नाही. हे असे का होते? याचे कारण असे, की आपले मातृभाषेच्या नियमांकडे खूप दुर्लक्ष झालेले असते. लेखनविषयक नियमांकडे आपण गांभीर्याने लक्ष देत नाही. ही वास्तवता आपल्याला नाकारून चालणार नाही. आपले बोलणे आणि लिहिणे यांच्या संबंधाचे भान आपण ठेवायलाच पाहिजे. आपण तोंडाने जी भाषा बोलतो, ती भाषा ध्वनीच्या साहाय्याने बनलेली असते. 'आपले तोंड म्हणजे ध्वनी निर्माण करणारी एक पेटीच आहे.' तोंडावाटे निघणारे हे ध्वनी हवेत विरून जातात. ते नष्ट होऊ नयेत, म्हणून आपण ते रंगाने अर्थात वर्णाने लिहून ठेवतो. त्यामुळे ते नाश न पावता कायम तसेच राहतात; म्हणूनच त्यांना

‘अ–क्षर’ असेही म्हटले जाते. मित्रहो, हे सर्व आपण व्याकरणात शिकलो आहोत. आपल्या मनातील विचार, भावभावना व कल्पना इतरांपर्यंत पोहोचविण्यासाठी आपण अशी ध्वनियुक्त वाक्ये वापरतो. अक्षरांपासून शब्द, शब्दांपासून वाक्ये बनलेली असतात. अशा अर्थयुक्त वाक्यांनी भाषा बनलेली असते. भाषा सतत, हळूहळू बदलत असते. असे म्हणतात, की दर बारा कोसांवर भाषेचे स्वरूप बदलत जाते आणि प्रत्येकाच्या उच्चारात थोडा का होईना, फरक आढळून येतोच. त्या मानाने लेखन स्थिर असते.

आपल्या भाषेविषयी कितीही सांगितले, तरी ते कमीच आहे. आपल्या या मातृभाषेच्या, मायमराठीच्या शुद्धतेकडे आपण मराठी विषयाचे शिक्षक म्हणून जातीने लक्ष द्यावयास हवे. काही तज्ज्ञ व्याकरणकारांनी एकत्र येऊन लेखनविषयक काही नियम निश्चित केलेले आहेत आणि ते शासनमान्यही झाले आहेत. आपण सर्वांनीच त्या नियमांना अनुसरून लेखन करावे, अशी अपेक्षा आहे. एखादे वेळी एखादा शब्द कोणत्या नियमानुसार लिहिला आहे, हे सांगता नाही आले तरी चालेल; पण तो शब्द अथवा ते वाक्य, त्या नियमाला अनुसरून शुद्धच लिहिले गेले पाहिजे. नियमांप्रमाणे लेखन केल्यामुळे आपल्या लिखाणात एकवाक्यता येते, म्हणूनच तज्ज्ञांनी मान्य केलेले आणि शासनाने स्वीकारलेले हे अठरा नियम, प्रत्येक मराठी लेखन करणाऱ्या व्यक्तीला माहीत असायलाच पाहिजेत. हे अठरा नियम म्हणजे आपल्या मराठी भाषेच्या लेखनाचे अठरा अध्यायच आहेत, असे मला वाटते.




आता शुद्धलेखनाची दुसरी बाजू म्हणजे ‘आपले हस्ताक्षर!’ हस्ताक्षर कसे असावे याविषयी समर्थ रामदास म्हणतात की,

*वाटोळें सरळें मोकळें। वोतलें मसीचें काळें ।*
*कुळकुळीत वळी चालिल्या ढाळें। मुक्तमाळा जैशा ।।*

याचा अर्थ असा, की आपण लिहिलेली अक्षरे मुक्तमाळाच आहेत, असे वाटायला हवे. शक्यतो काळी शाई वापरावी, सरळ ओळीत लिहावे, अपेक्षित सर्व मजकूर लिहून झाल्यावर ते एकटाकी लिहिले आहे असे वाटावे. असे लिहिणे अवघड नाही. आपले शुद्धलेखन आणि हस्ताक्षर या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. प्रत्येक मराठी भाषकाचे हस्ताक्षर सुंदर असावे, किमान ते वाचनीय तरी असावे. हस्ताक्षर सुधारण्यासाठी फारशी मेहनत घ्यावी लागत नाही. ते सहजसाध्य आहे. त्यासाठी फक्त आंतरिक इच्छा आणि जिद्द असावी लागते. हस्ताक्षर सुधारण्यासाठी वयाचीही अट नसते. कोणत्याही वयात व्यवस्थित सराव केला, तर आपले हस्ताक्षर सुधारू शकते. हस्ताक्षर सुधारण्यासाठी अनेक जण, अनेक पद्धतींचा वापर करतात. आपणास जी पद्धत योग्य वाटते, ती आपण स्वीकारू शकता.

अनुभव असा आहे, की मुलांना सलग दहा–बारा ओळीसुद्धा लिहिता येत नाहीत. संगणक आल्यापासून तर म्हणावे तितके लेखन होत नाही. एक पान वाचले, तर दहा पाने लेखन करता आले पाहिजे. हल्ली तेवढा लेखनसराव होत नाही. यासाठी दररोज स्वतः एक पान तरी लिहिण्याची सवय लावून घ्यावी. आपले पाहून आपले विद्यार्थीही तसे लिहू लागतील. आपोआपच त्यांचे हस्ताक्षर सुधारत जाईल. पूर्वीसारखी शुद्धलेखन वही सक्तीची करावी. दररोज थोडा–थोडा सराव केला,

तर वर्ष–सहा महिन्यांत निश्चितच फरक पडतो. मी माझ्या विद्यार्थ्यांवर असा प्रयोग केला आहे.

काही जणांचे अक्षर सुरेख असते, पण ते वळणदार नसते. काना–मात्रा–उकार–वेलांटी–गोलाकार–उंची–जाडी इत्यादींमध्ये प्रमाणबद्धता नसते. हे सर्व अक्षरांचे अवयव आहेत. शरीराचे अवयव प्रमाणशीर नसतील, तर मनुष्याची आकृती बेढब दिसते, त्याप्रमाणे अक्षरांचे अवयव प्रमाणबद्ध नसतील, तर अक्षर सुंदर असूनही ते बेढब दिसते. त्यामुळे अक्षर सुधारण्यापूर्वी प्रथम – । / ि ी ॅ ै ʼʼ ʼʼ ु ू ृ अशा अक्षर–अवयवांचा चांगला सराव करावा. उभ्या, तिरप्या, आडव्या रेषा, अर्धगोलाकार, पूर्ण गोलाकार, उकार, वेलांटी हे अवयव सरावाने प्रमाणबद्ध येतील. त्यानंतर फक्त अक्षरांचा आणि त्यानंतर बाराखडीचा सराव करून, मग पुस्तकात पाहून दररोज, किमान एक पान तरी लिहावे. हाताला वळण लागण्यासाठी सुरुवातीला टोकदार पेन्सिलीने सराव करावा. त्यानंतर पेनाचा वापर करण्यास हरकत नाही. एकरेघी, दुरेघी वहीचा वापर आपण करू शकता. काही जण 'कट् नीबचा' वापर करून सराव करतात, पण त्यामुळे अक्षरांची जाडी वाढण्याची शक्यता असते. पूर्वी लिखाणासाठी शाईपेनचा सर्रास वापर होत असे. आता मात्र विविध प्रकारचे पेन बाजारात उपलब्ध आहेत. आपणास जे पेन सोयीचे वाटते, ते पेन आपण शुद्धलेखन सरावासाठी वापरू शकता. 'दिसामाजी काहीतरी ते लिहावे' ही उक्ती कायम लक्षात ठेवावी. आपल्या विद्यार्थ्यांनाही अशी सवय लावण्याचा मनापासून प्रयत्न करावा. आपल्यापैकी प्रत्येकाचेच हस्ताक्षर सुरेख पाहिजे. 'खराब अक्षर ही अर्धवट शिक्षणाची खूण आहे,' असे महात्मा गांधी म्हणत. प्रबोधनकार ठाकरे यांचा 'मातोश्री' हा पाठ शिकवत असताना त्यातील एक वाक्य माझ्यासाठी प्रेरणादायी ठरले; ते वाक्य आहे : 'ज्याचे अक्षर खराब त्याची दानत खराब'. अक्षरावरून आपला स्वभावही कळू शकतो. मित्रांनो, शुद्धलेखन आणि हस्ताक्षर या दोन्हीही बाजूंकडे आपण प्रयत्नपूर्वक लक्ष द्यावे, असे आवाहन मी आपणास मराठीचा एक निवृत्त, ज्येष्ठ शिक्षक म्हणून करतो. आपण माझ्या या आवाहनास अल्पसा तरी प्रतिसाद द्याल, अशी अपेक्षा करतो.

❑❑❑

---

**(पृष्ठ क्र. ८ वरून)**

तर असतातच; पण विश्वासार्हही असतात. आपली वाचनाची भूक भागविण्यासाठी ते सदैव तत्पर असतात.

माझ्याकडे अनेक मराठी साहित्यिकांचे साहित्य ग्रंथरूपात आहे. त्यात आचार्य विनोबा भावे, आचार्य प्र. के. अत्रे, साने गुरुजी, प्राचार्य शिवाजीराव भोसले, व्यंकटेश माडगूळकर, रवींद्र पिंगे, रणजीत देसाई, पु. ल. देशपांडे, महात्मा गांधी, ग. दि. माडगूळकर, यदुनाथ थत्ते, राजा मंगळवेढेकर, धनंजय कीर यांचा विशेषत्वाने समावेश आहे. या साहित्यिकांचे साहित्य मी आवडीने वाचले आहे. त्यांचे साहित्य हे माझे सखेसोबती आहेत. या ग्रंथांचे निर्माते पुढच्या मुक्कामी निघून गेलेत; पण त्यांनी वेचलेले अनुभवकण त्यांच्या ग्रंथात साठवलेले आहेत. हे अनुभवकण माझे अनुभवविश्व समृद्ध करतात. जगण्याची उमेद वाढवतात. मनावरचे मळभ दूर करतात. जगण्याची उमेद वाढवतात. त्यांची ही ग्रंथसंपदा माझे जीवनपाथेय आहे. त्यांनी माझी रसिकता वाढवली. जगण्याचा भरभरून आनंद दिला. जीवनातला बराचसा वेळ त्यांच्या संगतीत मजेत गेला. अजूनही मजेत जात आहे.

❑❑❑

# शब्दांतील पहिल्या, अनुस्वारयुक्त, विसर्गयुक्त आणि जोडाक्षरापूर्वीच्या अक्षरांचे लेखन

**सलिल वाघमारे**
पुणे
भ्रमणध्वनी : ९८२०४४१५१३

**(मराठी प्रमाणलेखन नियम : लेख – ४)**

*मराठी शब्दांतील अनुस्वारयुक्त, विसर्गयुक्त (विसर्गापूर्वी), जोडाक्षरयुक्त अक्षरांचे इकार–उकार ऱ्हस्व असतात. तीन किंवा त्यापेक्षा जास्त अक्षरी शब्दांतील पहिल्या अक्षरांचेही इकार–उकार साधारणतः ऱ्हस्व असतात. अर्थात काही अपवाद आहेत. विद्यार्थ्यांनी या गोष्टी बारकाईने अभ्यासल्यास मराठीतील बरेचसे शब्द अचूक लिहिण्यास मदत होते.*

## (अ) मराठी शब्दांतील पहिल्या अक्षरांचे इकार–उकार, साधारणत: ऱ्हस्व असतात :

तीन किंवा तीनपेक्षा अधिक अक्षरी मराठी शब्दातील पहिले अक्षर साधारणतः ऱ्हस्व असते. त्यापुढील अक्षरे ऱ्हस्व असो अथवा दीर्घ; या शब्दांतील पहिली अक्षरे मात्र साधारणतः ऱ्हस्वच असतात.

**उदाहरणार्थ : ऱ्हस्व इकार :** इलाज, किनारा, गिधाड, चिखल, जिलबी, टिचकी, ठिपका, ढिलाई, तिजोरी, दिखाऊ, धिटाई, नितळ, पितळी, शिकार इत्यादी. (तीन अक्षरी शब्द )

इमारत, इवलासा, किचकट, खिरापत, गिळंकृत, चिकित्सक, जिवापाड, झिरपणी, नितळाई, निसरडा, पिचकारी, निरीश्वरवादी, विरजण, हिरवळ इत्यादी. (चार अक्षरी शब्द)

**ऱ्हस्व उकार :** उकळी, उगम, उडीद, उशीर, खुशाल, खुराक, चुटकी, जुळणी, झुणका, दुसरा, फुसका, सुपारी इत्यादी. (तीन अक्षरी शब्द)

कुचकामी, कुलस्वामी, खिदळणे, खुशामत, गुजराण, गुजराती, गुरुकिल्ली, घुसखोर, चुपचाप, जुळवणी, फुटकळ, टुणकन इत्यादी (चार अक्षरी शब्द)

उदयोन्मुख, हुलकावणी, बुजगावणे, मुखकमल, रुद्रावतार, सुखोपभोगी, भुजंगप्रयात, पुनरागमन इत्यादी. (पाच अक्षरी शब्द)

खिजगणती, चिरतारुण्य, जिवाभावाचा, शिरसाष्टांग इत्यादी. (सहा अक्षरी शब्द)

### काही क्रियापदे :

किसणे, खिदळणे, चिरडणे, जिंकणे, डिवचणे, फितवणे, फिरकणे, बिघडणे, विंचरणे, विचारणे, विसावणे, शिकवणे इत्यादी.

वरील शब्दांचे निरीक्षण केले असता, मराठी शब्द तीन, चार, पाच अथवा सहा अक्षरी असो, पहिल्या अक्षरापुढील अक्षरे कशीही असो, या शब्दांतील पहिले अक्षर ऱ्हस्वच असते.

### अपवाद :

या नियमास संस्कृत तत्सम शब्दांचा अपवाद आहे. काही तत्सम तीन अक्षरी किंवा त्यापेक्षा जास्त अक्षरी शब्दांच्या पहिल्या अक्षरांचे इकार–उकार मुळात दीर्घ असतात. त्यामुळे ते मराठीतही दीर्घच लिहावेत.

**उदाहरणार्थ : दीर्घ इकार :** ईश्वर, कीचक, कीटक, क्रीडा, क्रीडास्पर्धा, गीर्वाण, जीवन, जीवनगाथा, जीवनावश्यक, जीवित, मीलन, मीमांसा, भीषण, बीभत्स, नीरस, नीलेश, नीलिमा, पीठाधिपती, श्रीमान इत्यादी.

**दीर्घ इकार :** चूडामणी, भूपाळी, भूमिती, नूतन, पूरक, भूगोल, सूचना, भूकंप, दूषण, धूसर, दूषण, दूषित, धूलिवंदन, धूलिकण, धूतपापेश्वर इत्यादी.

**(ब) अनुस्वारयुक्त अक्षरांचे इकार–उकार ऱ्हस्व :**

अनुस्वारयुक्त अक्षरे म्हणजे, ज्या अक्षरांवर अनुस्वार आहेत अशी अक्षरे. मराठी तसेच संस्कृत शब्दांमधील कोणत्याही अक्षरावर अनुस्वार असल्यास त्या अक्षराचे इकार–उकार ऱ्हस्वच असतात. अनुस्वारयुक्त अक्षरांचा उच्चार ऱ्हस्व होत असल्यामुळे ही अक्षरे ऱ्हस्व लिहावीत. उदाहरणार्थ,

**संस्कृत : (१) ऱ्हस्व इकार :** इंद्र, इंद्रजाल, इंद्रिय, उपटसुंभ, अकिंचन, अचिंत्य, अजिंक्य, चिंता, चिंतन, नरसिंह, निंदा, निंद्य, विंध्य, पिंड, प्रतिबिंब, यत्किंचित, वैकुंठ, लिंग, स्फुलिंग, स्त्रीलिंग, रणशिंग इत्यादी.

**(२) ऱ्हस्व उकार :** उत्तुंग, अग्निकुंड, औदुंबर, कुंड, कुटुंब, चुंबक, तुंदिल, मुंज, मृत्युंजय, रिपुंजय, वैकुंठ, संयुक्त,

**मराठी :** (१) आंबटचिंबट, किंमत, खिंड, खिंडार, झिंग, टिंब, डिंक, सुंठ, लिंबू, सिंचन, अरविंद, शिंग, विंचू, पिंजरा, किंचित, किंबहुना, खिंकाळी, खिंड, खिंडार, हिंमत, चिंच, भिंत, लिंग, भिंग, सिंह, सिंधी, पिंक, भिंत, डिंक, सडाफटिंग इत्यादी.

(२) उंच, उंदीर, अरुंद, आकुंचन, कुंदा, कुंडी, कडुनिंब, काळुंदरा, किंवा, खुंटा, गुंगारा, घसरगुंडी, घुंगरू, चिंच, झुंजूमुंजू, तुरुंगवास, बासुंदी, लालबुंद, मुंगी, पाचुंदा, साळुंकी, हुंडा, हिंदी इत्यादी.

**अपवाद :**

(१) संस्कृतमधील अतींद्रिय व रवींद्र या दोन शब्दांतील अनुस्वारयुक्त अक्षरांचे (तीं व वीं) इकार दीर्घ आहेत. या दोन्ही शब्दांमध्ये सजातीय स्वर एकापुढे एक आल्यामुळे दीर्घत्व संधी होऊन ही अनुस्वारयुक्त अक्षरे दीर्घ होतात. अति + इंद्रिय. अति–या शब्दातील शेवटचा स्वर इ व इंद्रिय या शब्दातील पहिला स्वर इ हे दोन सजातीय स्वर एकापुढे एक येऊन दीर्घत्व संधी होतो. इ + इ = ई त्यामुळे अति + इंद्रिय मधील अति चा 'अती' होऊन 'अतींद्रिय' असा शब्द तयार होतो.

तसेच रवि + इंद्र या शब्दातील वि मधील इ हा स्वर व इंद्र या शब्दातील पहिला स्वर इ एकापुढे एक येऊन दीर्घत्व संधी होतो. (इ + इ = ई), त्यामुळे रवि + इंद्र = रवि मधील 'वि' चा 'वी' होऊन रवींद्र असा शब्द तयार होतो.

(२) नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर तसेच आदरार्थी बहुवचनांच्या सामान्यरूपांवरील अनुस्वार देताना हा नियम लागू होणार नाही. विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी अव्यये लागण्यापूर्वी नामांचे अथवा सर्वनामांचे सामान्यरूप होते. सामान्यरूपे ही दीर्घान्तच असतात, त्यामुळे अनेकवचनी सामान्यरूपांवर अनुस्वार येत असला तरी ती दीर्घान्तच राहतात. उदाहरणार्थ,

(१) नाम व सर्वनामांची अनेकवचनी सामान्यरूपे : कवींना, हिंदूंना, गुरूंना, मुलींना, चुलींमध्ये, विहिरींमध्ये.

(२) आदरार्थी बहुवचन : राष्ट्रपतींच्या, बापूजींना, गांधीजींचा, पंडित नेहरूंच्या, गुरुजींना इत्यादी.

(पृष्ठ क्र. २६ वर)

# Reading Comprehension with Fluency - A Global Scenario

**Arun Sangolkar**
Sr. Lecturer and HoD English
SCERT, Maharastra, Pune.

*Reading comprehension is an important skill for achiving overall literacy among teachers and students. NEP 2020 and NIPUN BHARAT also give focus on Reading comprehension. This article gives exact eyesight to the teachers about developing reading comprehension among the students.*

Reading is the only skill that can be used to comprehend the written material. Developing reading is also considered as the shortest way to develop the skill of writing. T. C. Baruh says that, "English is the library language ; Reading is the first aspect of language. Reading is the power of comprehension." NEP - 2020 talks about the highest priority to achieve Foundational Literacy and Numeracy by all students in primary schools by Grade 3 up to 2026-27. The basic learning requirement is reading, writing and arithmetic at the foundational level. So the first step of implementing NEP should be launching a National Mission on Foundational Literacy and Numeracy called 'NIPUN BHARAT' (NIPUN- **N**ational **I**nitiative for **P**roficiency in reading with **U**nderstanding and **N**umeracy)

FLN Mission focuses on several key components for achieving foundational literacy such as Oral Language Development (OLD), Reading Comprehension, Concept about Print, Writing, Vocabulary, Phonological Awareness, Decoding, Reading Fluency and Culture of Reading.

## Objectives of teaching reading :

To enable the students :

(1) To understand the lexical and the structural meanings of the words, phrases and sentences.

(2) To use appropriate sounds, stress and intonation patterns in reading English.

(3) To guess/predict the meaning of unfamiliar words and phrases with reference to the context.

(4) To recognise the meaning of various graphic signals such as punctuation marks, paragraph indentation, capitalisation etc.

(5) To understand the meaning of written English.

(6) To read written text, signals, pictures, posters etc. properly and correctly.

(7) To read for anticipation of the content, getting specific information and global understanding.

(8) To develop further reading comprehension skills such as narration, appreciation, analysis, synthesis, etc.

## Mechanics of reading :

**(1) Eye Span :** The number of words read in one complete moment of the eye is called 'eye span'.

**(2) Word/sentence as a whole :** While reading, we must look at the word/sentence as a whole and not the letters.

**(3) Slow readers Vs Fast readers :** Fast readers have a wider span to recognise one or two words / sentences in one complete moment of the eyes.

**(4) Speed of reading :** While reading some of the students put their fingers under every word, it has adverse effect on the speed of reading.

**(5) Association** of symbol, sound and sense.

**(6) Eye Movements :** Move the eyes consistently forward, regularly and rhythmically, pick up groups of words rather than isolated words.

**(7) Regressions :** Regressions often occur because we are attempting to take such long spans that we miss essential words and relationships. If this is noticeable in your reading, shorten the span.

**(8)** Complete absence of lip movements and vocalization.

### Steps of teaching reading :

(1) Preparation

(2) Central idea

(3) Loud reading by the teacher

(4) Silent reading by the students

(5) Discussions

(6) Testing comprehension

(7) Assignments

### Techniques for developing reading :

- Model reading
- Time bound reading
- Closed reading
- Using charts, posters, pictures, flash cards
- Competitions for Reading Comprehension
- Supervised reading
- Asking Questions

### Six pillars that contribute in successful reading :

(1) Oral language

(2) Phonics and Phonological awareness

(3) Decoding

(4) Vocabulary

(5) Fluency

(6) Comprehension

**(1) Oral language :** is the foundation of all literacy skills. If young children experience rich oral language by talking and listening to family members and other peers, they will have a large active storage of spoken vocabulary.

**(2) Phonics :** builds on phonological awareness children learn to connect the sound or phonemes to the letter of the alphabet or group of letters that is used to represent it whereas Phonological awareness is the ability to hear the sounds within language. Children with good phonological awareness can hear : Words and word species in language, Syllables, Rhyme, Phonemes. This knowledge and skills help children to accelerate the speed and comprehension.

**Phonological awareness** involves building an understanding of the sound structure of a language. The ability to notice, think about, and words with the sounds in spoken language that can be ultimately linked to the symbol system of the language. This domain includes the competencies of word awareness, rhyme awareness, and awareness of sounds within words which should emerge from their meaningful engagement with language.

**(3) Decoding** is an important component because 'it is the foundation on which all other reading instruction builds.' It involves deciphering written words based on understanding the relationship between symbols and their sounds. This domain includes competencies of print awareness, *akshara* knowledge and decoding and word recognition. The aspect of decoding the text is important but it should emerge from the context of children. The

purpose is to develop phonemic awareness. For this, teachers should select familiar and interesting texts for drawing attention to the sounds of the words and letters, and not follow the alphabet in sequence. This is also based on the principle that young children should move from known to unknown age-appropriate text.

It bridges the gap between word recognition and comprehension. If students cannot decode words while reading will lack fluency, their vocabulary will be limited and their reading comprehension will suffer.

**(4) Vocabulary :** When children have a large spoken vocabulary, they will use and understand lots of different words with their meanings. While reading, they will be placed to recognise and understand those words when they see them.

**(5) Reading fluency** refers to the ease with which children read. When reading aloud, fluency is affected by accuracy, rate and expression. It is essential to ask students to read aloud easier or familiar books. This will lead children to read confidently, automatically and with accuracy. Eat also helps to improve their rate of reading with Intonation, pauses and rhythm.

Fluency refers to allow the author's message to be communicated clearly. Fluency in reading gives readers confidence in their own ability as readers and helps them to be interested and motivated, and to enjoy reading. It also refers to the ability to read a text with accuracy, speed (automaticity), expression (prosody), and comprehension that allows children to make meaning from the text. Many children recognise *aksharas*, but read them laboriously, one-by-one. This hampers the process of understanding what is being read. Research links reading fluency to comprehension as to comprehend a sentence, children should be able to decode it in about 12 seconds. It leads to a quantitative model of reading efficiency that has a simple and transparent monitoring indicator. Reading fluency requires practice in reading words at a glance as a picture. If students develop the habit of reading words by spelling, it hampers the speed of reading. Regular practice in reading sight words will help learners to increase the speed of reading. Reading fluency improves reading comprehension and vice-versa.

**(6) Reading Comprehension** is the basic aim of reading. Reading comprehension is the ability to process text, understand its meaning, and to integrate with what the reader already knows (emergent knowledge). It involves constructing meaning from a text and thinking critically about it. When a child can comprehend, she/he is able to explain, extend, give examples, make inferences, predict and summarise what she/he has read. It develops students' critical thinking ability.

Reading comprehension involves two levels of processing according to Fergus I. M. Craik and Robert S. Lockhart.

(1)Shallow (low-level) processing : Shallow processing involves structural and phonemic recognition, the processing of sentence and word structure and their associated sounds.

(2)Deep (high-level) processing : Deep processing involves semantic processing which happens when we encode the meaning of a word and relate it to similar words.

## How to improve fluency :

Teachers, parents and caretakers must encourage such fluency at school, surroundings, home etc.

Encourage students to :

- Read and re-read favourite books.
- Read aloud with emotions in English or your first language.
- Use sound effects when reading.
- Use different voices to indicate the characters and narrator.
- Change your volume, tone and pace as you read different parts of a book.
- Have a fun and enjoy yourself.
- Listen to audio books together.
- Provide children with opportunities to read and reread a range of stories and informational texts by reading on their own, partner reading, or choral reading.
- Introduce new or unfamiliar words to children, and provides practice reading these words before they read on their own.
- Include opportunities for children to hear a range of texts read fluently and with expression.
- Encourage periodically timing a child's oral reading and then recording information about the student's reading rate and accuracy, to help monitor the student's progress.
- Give model fluent reading - By listening to good models of fluent reading, students learn how a reader's voice can help written text make sense. Read aloud daily to your students. By reading effortlessly and with expression, we are modeling for our students how a fluent reader sounds during reading.

## Reading comprehension

Good/proficient readers comprehend in different ways depending on the book, article or website they are reading. There are some strategies that can also be used by less proficient readers in order to improve their comprehension.

- Making connections between what is being read and the readers past experiences of books, life and the world.
- Asking questions about what is being read. What is this character going to do in the situation? Why did that character do that?
- Monitoring meaning, checking predictions confirming them, correcting them, re-predicting and re-reading.
- Creating a summary of key parts of the story or information.
- Creating a mental picture of the characters and its setting.
- Consider the text purpose-Why did the author write this book? How does the author intend for me to respond?
- Making Inferences : In everyday terms we refer to this as "reading between the lines". It involves connecting various parts of texts that are not directly linked in order to form a sensible conclusion. A form of assumption, the reader speculates what connections lie within the texts.
- Planning and Monitoring : This strategy centers around the reader's mental awareness and their ability to control their comprehension by way of awareness. Readers use context clues and other evaluation strategies to clarify texts and ideas.
- Asking Questions : To solidify one's understanding of passages of texts readers inquire and develop their own opinion of the author's writing, character motivations, relationships, etc. This strategy involves allowing oneself to be completely objective in order to find various meanings within the text.

- Determining Importance : Pinpointing the important ideas and messages within the text. Readers are taught to identify direct and indirect ideas and to summarize the relevance of each.
- Visualizing : With this sensory-driven strategy readers form mental and visual images of the contents of text. Being able to connect visually allows for a better understanding with the text through emotional responses.
- Synthesizing : This method involves marrying multiple ideas from various texts in order to draw certain conclusions and make comparisons across different texts.

### How to encourage comprehension among the students?

To ensure that students comprehend lengthy sentences correctly, they should start understanding the meaning of short phrases and grade-appropriate texts. In large scale assessments such as NAS, FLS, and SLAS, the focus is on assessing the comprehension of unknown texts. Along with the teachers, students must be able to retrieve and interpret the text by focusing on questions asked with wh-words like who, what, where, how did, why etc. **'Why questions'** should be focused to improve the comprehension power of the students.

(1) To help children see that the aim of reading is 'meaning making'.

(2) Read together for lots of different purposes then discuss and reflect on the things you read together.

(3) Comprehension shouldn't be forced it should come naturally from reading.

(4) Sharing our responses to a book or the text-I like this part because...... What did you like? I was surprised, what surprised you?

(5) Talk about other books or explain says that you are going to remember.

(6) Pause and predict at interesting points in a story.

(7) Before children start their formal instruction in literacy their understanding about print is essential, as print conveys meaning and has its own purposes and features. In a print rich classroom, children have many opportunities to interact with various forms of print. The displayed text needs to be meaningful, inviting and relevant for the children.

(8) Various child-friendly components such as poem corners, message boards, theme boards, various charts like class responsibility chart, midday meal chart, chart of stories etc., display boards (children's writings, drawings, collections, variety of texts, pictures with captions, instructional material developed by teacher etc.) may be developed and displayed on walls at the eye level of children.

(9) In shared reading, big books with relevant illustration and text are read in pairs or by the teacher involving children. This also builds up their vocabulary, sense of directionality while reading. Shared reading is important for early literacy and most effective for Grade 1 and Grade 2 children.

(10) Every class should have a reading corner/ reading area with a variety of age-appropriate children's literature. Children should be provided enough time and opportunities to spend time with the books.

(11) Retell stories to each other after reading.

*(https://www.literacyhub.edu.au/for-families/the-big-six-of-literacy-a-guide-for-families/)*

### Connection between Reading Fluency and Comprehension

Reading comprehension is the ability to understand and retain the information given in

the text as you read it. Reading fluency, on the other hand, is the accuracy and speed of reading without conscious attention to the mechanics of reading. A fluent reader has the ability to read and understand words automatically. They are able to more easily comprehend complete sentences and entire reading selections.

If you struggle to read each word in a sentence, it is much harder to understand the entire sentence. Slow, single-word reading leads to both poor reading comprehension and frustration. If you cannot read fluently, you typically don't like to read because of how labor intensive it is. The more fluid and fast you read, your understanding of what you read becomes automatic and more fun. Reading can become an enjoyable activity for everyone.

When you are a fluent reader, you are able to read without thinking about the mechanics of reading. S. Jay Samuels started doing research in the 1970's. In 2006, he states, "Comprehension requires the fluent mastery of the surface-level aspects of reading."

*Read the sentence, 'John can go to the store.' Then several pages later, you get to the questions and one question asks, "Why couldn't John go to the store?" The question doesn't make any sense to you, because you read John* ***can*** *go to the store. Upon going back and re-reading, you find that the sentence really said, "John* ***can't*** *go to the store." The whole meaning was lost by skipping the apostrophe t in the word* ***can't****. That is one way that reading fluency problems impact comprehension.*

Cecil Mercer who has done extensive research at The University of Florida has proved **short, daily practice of five to six minutes a day creates substantial reading gains**. The key to overall success was doing repeated oral reading over a six month to a twenty-three-month time interval. Remember, reading fluency is a critical component to improving reading comprehension.

Daily reading fluency training for only 5 minutes a day with the reading drills found in '5 Minutes to Better Reading Skills' can have one of the biggest impacts to improve your reading skills. Mary Ann Metzner says, "We are thoroughly enjoying the 5 Minutes to Better Reading Skills program. I see improvement already. My 6th-grade son started at only 70 wpm but has already increased his speed to 115 wpm."

**Fluency score-Words Correct Per Minute (WCPM).**

One minute reading : Total words read (minus) errors made = words correct per minute.

(1) Select a 100-word passage from a grade-level text.

(2) Have individual students read each passage aloud for exactly one minute.

(3) Count the total number of words the student read for each passage.(with attempted words)

(4) Count the number of errors the student made on each passage.

(5) Subtract the number of errors read per minute from the total number of words read per minute. The result is the average number of words Correct Per Minute (WCPM).

(6) Repeat the procedure several times during the year. Graphing students' WCPM throughout the year easily captures their reading growth.

*(https://www.readingrockets.org/teaching/reading101-course/modules/fluency/fluency-practice)*

**How many words per minute should my students to be read?**

**(1) First grade :** 30-40 words (read correctly by the end of the year)

**(2) Second grade :** 30-45 words (read correctly by the end of the year)

**(3) Third grade :** 45-60 words (read correctly by the end of the year)

*(Will increase gradually)*

*(NIPUN BHARAT - Guidelines for Implementation and FLS Survey)*

## Assessment :

The FLS assessment is aimed at assessing a multiplicity of skills associated with foundational literacy, including the skill of Oral Reading Fluency (ORF) with Reading Comprehension of Class 3 children along with other dimensions of foundational learning. The focus of ORF is both the child's ability to decode the words correctly (precision) and to read the words at pace (Fluency). ORF with Comprehension implies that reading is a meaning-making activity and therefore, the reading comprehension needs to be assessed as a follow up of reading of a text. The task of ORF with Reading comprehension as given in the FLS assessment consisted of reading aloud a short story of 60-70 grade level appropriate words and answering a total of five retrieval and inference based questions from the story.

The Global Proficiency Framework for Reading defines the global minimum proficiency levels that learners expected to demonstrate at the end of each grade level, from grades one to nine. It comprises four Global Proficiency Levels (GPLs) and detailed Global Proficiency Descriptors (GPDs) for each level. The Descriptors have domains, constructs, sub-constructs, and knowledge and skills by grade, subject, and level.

**Global Proficiency Framework and benchmarking of ORF with Comprehension (English)**

| Global Proficiency Levels | Below Partially Meets Global Proficiency Level | Partially Meets Global Proficiency Level | Meets Global Proficiency Level | Exceeds Global Proficiency Level |
|---|---|---|---|---|
| Benchmark | 0 - 14 correctly read words with comprehension in one minute | 15 - 34 correctly read words with comprehension in one minute | 35 - 53 correctly read words with comprehension in one minute. | 54 and above correctly read words with comprehension in one minute. |
| Percentage of Students meeting the standard | 15 | 30 | 21 | 34 |

## Why reading comprehension with fluency is important?

Reading comprehension with fluency leads to further process of language development and several expressions like describing, analysing, synthesizing, narrating, summarising, reporting, appreciating, commenting, paraphrasing, delivering the content in different forms etc.

Hence, fluency leads to reading comprehension whereas reading comprehension leads to further language development skills. Comprehension is the thrust area of language where we build our language development.

**References :**

National Education Policy 2020, Ministry of Human Resource Development, Government of India.

National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy NIPUN BHARAT (A National Mission on Foundational Literacy and Numeracy) GUIDELINES FOR IMPLEMENTATION, Department of School Education and Literacy Ministry of Education, Government of India, 2021.

*(https://www.literacyhub.edu.au/for-families/the-big-six-of-literacy-a-guide-for-families/)*

*(https://www.readingrockets.org/teaching/reading101-course/modules/fluency/fluency-practice)*

FOUNDATIONAL LEARNING STUDY 2022 (FLS), National report on Benchmarking for Oral Reading Fluency with Reading Comprehension and Numeracy, Ministry of Education and NCERT, New Delhi

❑❑❑

---

## व्यंजनान्त शब्द

मराठीमध्ये कोणताही शब्द स्वरान्त म्हणजेच स्वरयुक्त उच्चारण्याची व लिहिण्याची पद्धत आहे. उदा., क् + अ = क, क् या व्यंजनामध्ये अ हा स्वर मिसळ्यामुळे क स्वरान्त होतो. संस्कृतमधून जसेच्या तसे (तत्सम) आलेल्या काही शब्दांच्या शेवटच्या अक्षराचा उच्चार निभृत म्हणजेच तोटका होतो; म्हणून या शब्दांच्या शेवटच्या अक्षरांचे पाय मोडून म्हणजेच व्यंजनान्त लिहिण्याची पद्धत होती.

**उदाहरणार्थ :** व्यंजनान्त शब्द – अर्थात्, कदाचित्, क्वचित्, किंचित्, तद्वत्, तस्मात्, परिषद्, पश्चात्, भगवान्, विद्वान्, विद्युत्, संसद्, साक्षात्, श्रीमान् इत्यादी.

मराठीमध्ये कोणताही शब्द स्वरान्त उच्चारण्याची प्रवृत्ती असल्यामुळे मराठीमध्ये आता हे सर्व शब्द स्वरान्त उच्चारले व लिहिले जातात. **उदाहरणार्थ :** स्वरान्त शब्द – अर्थात, कदाचित, क्वचित, किंचित,तद्वत, तस्मात, परिषद, पश्चात, भगवान, विद्वान, विद्युत, संसद, साक्षात, श्रीमान इत्यादी.

**नियम :** मराठीमध्ये रूढ झालेले तत्सम व्यंजनान्त शब्द स्वरान्त (अकारान्त) लिहावे. पूर्वी इंग्रजीतील काही शब्द, विविध शैक्षणिक पदव्या, व्यक्तींच्या व गावांच्या नावातील अकारान्त अक्षरे व्यंजनान्त लिहिली जात.

**उदाहरणार्थ :** एम्.ए., पीएच्.डी., सॉक्रेटिस्, नारायणन्, केंब्रिज् आता हे सर्व व्यंजनान्त शब्द स्वरान्त (अकारान्त) लिहावे. उदा., एम.ए., पीएच.डी., सॉक्रेटिस, नारायणन, केंब्रिज इत्यादी.

पूर्वी खालील मराठी शब्दही व्यंजनान्त लिहिले जात होते.

**उदाहरणार्थ :** तसेच्, चटकन्, फाडकन्, चुप्, धाडकन् इत्यादी.

आता हे मराठी व्यंजनान्त शब्दही अकारान्त लिहावे म्हणजेच तसेच, चटकन, फाडकन, चुप, धाडकन, इत्यादी असे लिहावे.

**अपवाद** : मराठीमध्ये आता फक्त 'अन्' हा एकच शब्द व्यंजनान्त लिहावा. त्यामुळे मराठीमध्ये 'अन्' हा शब्द वगळता कोणताही शब्द व्यंजनान्त असणार नाही.

मात्र शब्दांन्तर्गत (शब्दांमध्ये) असे पूर्वी व्यंजनान्त असणारे शब्द आल्यास ते पाय मोडून लिहावे. अर्थात व्यंजनान्त अक्षरे शब्दामध्ये आल्यामुळे अशा शब्दांना व्यंजनान्त शब्द म्हणता येणार नाही.

**उदाहरणार्थ :** विद्युत्प्रकाश, संसद्सभा, शुद्धलेखन, उद्घाटन, खड्ग, उच्छ्वास.

**– सलिल वाघमारे**

# राष्ट्रीय विज्ञान दिन

**डॉ. सखाराम शिंदे**
जि. प. कें. प्राथ. शाळा अशोकनगर,
ता., जि. बीड
भ्रमणध्वनी : ९०२८२८६८९८

*२८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रामन यांनी पदार्थ विज्ञान या विषयात महत्त्वपूर्ण असे संशोधन केले. त्यांनी प्रकाशाचे विकीरण या संदर्भातील महत्त्वपूर्ण संशोधन २८ फेब्रुवारी, १९२८ ला जाहीर केले. २८ फेब्रुवारी हा दिवस १९८६ पासून विज्ञान दिन म्हणून साजरा होतो. हा दिवस साजरा करण्यामागील उद्दिष्ट आणि या शोधाबद्दलची माहिती, तसेच विज्ञानाचे आपल्या जीवनातील स्थान आणि महत्त्व सांगणारा हा लेख.*

एकविसावे शतक हे विज्ञान-तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. विज्ञान व तंत्रज्ञान ही या शतकातील सर्वांत मोठी शक्ती आहे. आजचे मानवी जीवन सर्व अंगांनी विज्ञान-तंत्रज्ञानाने व्यापलेले आहे. अश्मयुगीन रानटी मानवापासून आजच्या प्रगत मानवापर्यंत झालेला विकास विज्ञानामुळेच झाला आहे. विज्ञान मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. आपण सकाळी झोपेतून उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत वापरत असलेल्या सर्व वस्तू विज्ञानाच्या आधारे निर्माण केलेल्या आहेत. शेती, शिक्षण, सेवा, वाहतूक, व्यापार, उद्योगधंदे, आरोग्य तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रांत विज्ञानातील संशोधनामुळे लक्षणीय बदल घडून आलेले आहेत.

सभोवतालच्या जैविक-अजैविक घटकांचे निरीक्षण-प्रयोग-निष्कर्ष या प्रक्रियेतून चिकित्सक व शिस्तबद्ध पद्धतीने मिळवलेले वस्तुनिष्ठ ज्ञान म्हणजे विज्ञान होय. विज्ञानातील विविध संशोधनांमुळे मानवी जीवन सुखी व समृद्ध बनले आहे. हिप्पोक्रेट्स, ॲरिस्टॉटल व आर्किमिडीज यांच्यानंतर आधुनिक विज्ञानाची सुरुवात युरोपमध्ये सोळाव्या शतकात भौतिकशास्त्रामधील संशोधनाने झाली. कोपर्निकस व केपलर यांनी ग्रहांच्या भ्रमणाचा अभ्यास केला. गॅलिलिओने पृथ्वी सूर्याभोवती फिरत असल्याचे सांगितले. न्यूटनने गुरुत्वाकर्षण व गतीचे नियम शोधले. रॉबर्ट बॉइल, जोसेफ प्रिस्टले, रॉबर्ट जेन्नर, चार्लस् डार्विन, लुइस पाश्चर यांच्या संशोधनाने रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र यांमध्ये प्रगती झाली. जॉन डाल्टन, आईन्स्टाईन, वॉट्सन आणि क्रिक यांनी अणुसंरचना, सापेक्षतावाद, किर्णोत्सर्ग, पेशी संरचना, गुणसूत्रे व जनुकांची रचना यांमध्ये महत्त्वपूर्ण संशोधन केले.

आपल्या देशातही संशोधनाची उज्ज्वल परंपरा आहे. सुश्रुत, वराहमिहीर, आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, नागार्जुन, भास्कराचार्य इत्यादी संशोधकांनी गणित, खगोलशास्त्र आणि वैद्यकशास्त्र संशोधनात अनमोल योगदान दिले. डॉ. जगदीशचंद्र बोस, डॉ. सी. सुब्रह्मण्यम, डॉ. होमी जहांगीर भाभा, डॉ. विक्रम साराभाई, डॉ. एम. एस. स्वामीनाथन, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम, डॉ. अनिल काकोडकर आदींनी आधुनिक विज्ञानात आपल्या संशोधनाने मोलाची भर घातली.

पदार्थविज्ञानातील एक महत्त्वपूर्ण भारतीय संशोधक म्हणजे डॉ. चंद्रशेखर व्यंकट रामन (डॉ. सी. व्ही. रामन) होत. सर चंद्रशेखर व्यंकट रामन यांनी प्रकाशाच्या विकिरणाच्या संदर्भात केलेले संशोधन २८ फेब्रुवारी, १९२८ रोजी जाहीर केले. ते 'रामन परिणाम' नावाने ओळखले जाते. रामन परिणाम शोधाच्या आठवणीसाठी भारतात १९८६ पासून दरवर्षी

२८ फेब्रुवारी रोजी ‘राष्ट्रीय विज्ञान दिन’ साजरा केला जातो. या शोधासाठी रामन यांना नोबेल पुरस्कार मिळाला. डॉ. रामन यांना भारतरत्न पुरस्कारही मिळाला आहे.

जेव्हा एखादा प्रकाशाचा किरण धूलिकण विरहित, पारदर्शक रासायनिक संयुगातून जातो, त्या वेळी त्यातील प्रकाशाचा काही अंश येणाऱ्या किरणांच्या विरुद्ध दिशेला तयार होतो. हे पसरलेले प्रकाशाचे किरण एकाच तरंगाचे असतात, मात्र काही प्रकाश किरण हे सोडण्यात आलेल्या मूळ प्रकाश किरणांहून वेगळ्या तरंगाचे असतात यालाच ‘रामन इफेक्ट’ असे म्हणतात. ‘रामन परिणाम’ मुळे प्रत्येक पदार्थाचे गुणधर्म समजण्यास मदत होते. अमली पदार्थ व ज्वलनशील पदार्थांच्या तपासणीसाठी या परिणामाचा वापर होतो.

विज्ञानाची आवड निर्माण करणे, सभोवतालच्या घटकांचे निरीक्षण व चिकित्सा करून निष्कर्ष काढण्याची सवय लावणे, विज्ञान निष्ठा, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे, संशोधनासाठी प्रेरणा देणे आणि देश तसेच जागतिक पातळीवर झालेल्या वैज्ञानिक प्रगतीची ओळख करून देणे या उद्देशाने ‘राष्ट्रीय विज्ञान दिन’ साजरा केला जातो. देशातील विज्ञानाची प्रगती कायम ठेवणे, अणुऊर्जेविषयी जागरूकता निर्माण करणे आणि विज्ञानाच्याआधारे देशाचा विकास करणे ही राष्ट्रीय विज्ञान दिनाची काही उद्दिष्टे आहेत.

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त राष्ट्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान परिषद व विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून देशभरात अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शाळा, महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था, विज्ञान संस्था आणि प्रयोगशाळा यांमध्ये व्याख्याने, निबंध लेखन, चित्र प्रदर्शने आणि चर्चासत्रे यांचे आयोजन केले जाते.

विज्ञानातील संशोधनामुळे रोगनिदान, औषधनिर्माण, उपचार-शस्त्रक्रिया, आहार, जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांत प्रगती झाली. प्रतिजैविके आणि लसींच्या शोधामुळे आज मानवाने पटकी, धनुर्वात, घटसर्प, विषमज्वर, क्षय, देवी, प्लेग, पोलिओ हे आजार नष्ट केले आहेत. कृत्रिम उपग्रह, संगणक, इंटरनेट, मोबाईल यांमुळे जग जवळ आले आहे. कृषी क्षेत्रातील संशोधनाने संकरित बियाणे, खते, कीटकनाशके, आधुनिक अवजारे उपलब्ध झाल्यामुळे कृषी उत्पन्न वाढले आहे. परिणामी भारत देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला आहे. विज्ञान-तंत्रज्ञानातील संशोधनामुळे आपण कोविड महामारीला तोंड देण्यात यशस्वी झालो आहोत.

विज्ञानातील संशोधनामुळे मानवाने विविध क्षेत्रांमध्ये प्रगती केली आहे. सोबतच काही अवघड प्रश्नही निर्माण झाले आहेत. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या चुकीच्या वापरामुळे प्रदूषण, प्लॅस्टिकची विल्हेवाट, पर्यावरणाचा नाश, आण्विक शस्त्रास्त्रे, जैविक अस्त्रे, जागतिक तापमानवाढ, सायबर गुन्हेगारी असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. विज्ञानाच्या आधारे टिकाऊ प्रगती साधण्यासाठी सर्वांनी विज्ञान-तंत्रज्ञानाचा विवेकपूर्ण वापर करण्याचा संकल्प या राष्ट्रीय विज्ञान दिनी करूया!

❑❑❑


**वर्गणीदार होण्यासाठी**

‘जीवन शिक्षण’ मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे.

**https://scertmaha.ac.in/ jeevanshikshan/**

**या लिंकवर जाऊन तसेच क्यूआर कोड स्कॅन करून सुद्धा तुम्ही वर्गणीदार होऊ शकता.**

**संपर्क : jeevanshikshan@maa.ac.in**

# राज्यस्तरीय इंग्रजी भाषा चर्चासत्र (Symposium)

**डॉ. विशाल तायडे,**
वरिष्ठ अधिव्याख्याता,
प्रादेशिक विद्या प्राधिकरण
(आंग्लभाषा तज्ञत्व), औरंगाबाद

*राज्य शैक्षणिक संशोधन प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सोलापूर आणि दलितमित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय इंग्रजी भाषा चर्चासत्राचे आयोजन २० जानेवारी रोजी करण्यात आले होते. यामध्ये राज्यभरातून उत्कृष्ट काम करणारे अधिकारी, शिक्षक यांना संशोधन, नवोपक्रम, पोस्टर्स सादरीकरण इत्यादी उपक्रम सादर करण्याची संधी मिळाली.*

गेल्या काही वर्षांपासून प्रादेशिक विद्या प्राधिकरण (आंग्लभाषा तज्ञत्व), औरंगाबाद संपूर्ण राज्यामध्ये शिक्षकांच्या वतीने इंग्रजीसाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांना राज्यस्तरीय व्यासपीठ मिळावे यासाठी प्रयत्नरत आहे. यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय इंग्रजी भाषा चर्चासत्राचे आयोजन केले जाते. यामध्ये राज्यातील निवडक उपक्रमशील शिक्षकांना आमंत्रित करण्यात येते. ते आपल्या कार्यक्षेत्रात शालेय विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषिक कौशल्ये विकसित होण्यासाठी करत असलेल्या विविध प्रयोगांची मांडणी करण्याची त्यांना संधी दिली जाते. तसेच इतरांनाही या प्रयोगातून शिकण्याची प्रेरणा मिळते.

अशाच प्रकारचे राज्यस्तरीय चर्चासत्र (Symposium) दि. २० जानेवारी, २०२३ रोजी सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा या ठिकाणी आयोजित करण्यात आले होते. येथील दलितमित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा यांनी प्रायोजित केलेल्या या चर्चासत्राला संपूर्ण राज्यातून इंग्रजीसाठी काम करणाऱ्या प्रयोगशील शिक्षकांना आमंत्रित केले होते. राज्यातील सर्व जिल्ह्यांमधून इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांमधून प्रत्येकी पाच शिक्षक यात सामील झाले होते.

प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद यांचेमार्फत प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंत इंग्रजी भाषा विकासासाठी अनेक उपक्रम सुरू केलेले आहेत. यात प्राथमिक स्तरासाठी Technology-enabled Education through Joint Action and Strategic initiatives (TEJAS) आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरासाठी CHESS हे प्रमुख उपक्रम आहेत. याशिवाय Spoken English, MOOC, ELCRLM (English Kit), BCPT videos, Read to Me या व अशांसारख्या उपक्रमांच्या माध्यमातून शिक्षक व विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषा समृद्ध व्हावी यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. याचा सकारात्मक परिणाम म्हणून Teacher Activity Group (TAG) हे राज्यातील प्रत्येक तालुक्यात तयार झाले. साधारणतः २५ शिक्षकांच्या केंद्र स्तरावरील या कृतिशील गटाने इंग्रजी भाषेच्या अनुषंगाने परस्परांच्या सहकार्यातून स्वतःच्या व आपल्या विद्यार्थ्यांच्या इंग्रजी भाषिक कौशल्यांचा विकास करण्यासाठी योगदान दिलेले आहे. तथापि, कोविड-१९ दरम्यान या सर्व

उपक्रमांना मर्यादा आल्या होत्या. त्या दृष्टीने राज्यातील इंग्रजी शिक्षकांना पुन्हा एका मंचावर आणून त्यांना प्रेरित करण्यासाठी असे चर्चासत्र घेणे गरजेचे होते.

या राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्‌घाटन श्री. दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सोलापूर, डॉ. कलीमोद्‌दीन शेख, संचालक, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, औरंगाबाद, डॉ. रामचंद्र कोरडे, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सोलापूर, श्री. अरुण सांगोलकर, इंग्रजी विभागप्रमुख, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे व श्री. सुजित कदम, अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या वेळी अमेरिकेतील फुलब्राईट स्कॉलरशिप प्राप्त बुलढाणा येथील शिक्षक डॉ. शिवाजी देशमुख यांच्या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

चर्चासत्रात सुरुवातीलाच श्री. अरुण सांगोलकर यांनी 'Reading Comprehension with Fluency : Global Scenario' या विषयाच्या अनुषंगाने अभ्यासपूर्ण असे Plenary speech दिले. यात त्यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा संदर्भ घेत पायाभूत साक्षरता प्राप्त करण्यासाठी वाचनकौशल्य विकास कसा महत्त्वाचा आहे हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले. यानंतर फुलब्राईट स्कॉलरशिपविषयी डॉ. शिवाजी देशमुख यांनी मांडणी केली. या चर्चासत्रातील दुसरे Plenary speech डॉ. उज्ज्वल करवंदे यांनी 'Oral Language Development' या विषयावर दिले. मौखिक स्वरूपात इंग्रजी भाषेचा विकास कसा करता येईल व त्यासाठी कशाप्रकारचे प्रयत्न केले पाहिजेत, हे त्यांनी नमूद केले.

राज्याचे शिक्षण आयुक्त मा. श्री. सूरज मांढरे हेदेखील या चर्चासत्रात आवर्जून सहभागी झाले होते. त्यांनी, 'अशा प्रकारचे उपक्रम हे शिक्षकांना प्रेरणादायी असतात. आजच्या काळातील इंग्रजीचे जागतिक स्तरावरील महत्त्व वादातीत आहे, हे लक्षात घेता महाराष्ट्रातील सर्व शाळांतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या इंग्रजी भाषिक कौशल्यांचा विकास होण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न केले पाहिजेत' असे आवाहन केले. त्यांच्या हस्ते चर्चासत्रातील विविध सत्रांचे फीत कापून उद्‌घाटन करण्यात आले.

चर्चासत्रात एकूण चार सत्रांच्या माध्यमातून शिक्षकांना प्रत्यक्ष रीतीने सहभागी करून घेण्यात आले होते. तीन स्वतंत्र हॉलमध्ये Best Practices in English (Primary, Secondary and Higher Secondary), English with reference to NEP, NAS and FLN तसेच New trends of English language in teaching, learning and evaluation या विषयांवर शिक्षकांचे सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. प्रत्येक जिल्ह्यातील एका शिक्षकाला कोणत्याही एका सत्रात सहभागी होण्याची संधी देण्यात आली होती. त्यांनी, दिलेल्या विषयावर आपल्या शाळेत ते घेत असलेल्या इंग्रजी भाषिक उपक्रमांचा संदर्भ देत मांडणी करणे अपेक्षित होते. सहभागी शिक्षकांनी दिलेल्या वेळेत अतिशय अभ्यासपूर्ण अशी मांडणी केली.

भोजनानंतर मुख्य सभागृहात पोस्टर सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. यामध्ये शिक्षक अतिशय उत्साहाने सहभागी झाले. शिक्षकांनी ते करत असलेल्या विविध उपक्रमांवर आधारित इंग्रजीत पोस्टर्स तयार केली होती. त्यांची नावीन्यपूर्ण मांडणी आणि प्रयोगशीलता वाखाणण्याजोगी होती. पन्नासहून अधिक शिक्षकांनी आपल्या पोस्टर्ससह या सत्रामध्ये सहभाग नोंदवला होता. या सर्व सत्रांमधून उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या

शिक्षकांची निवड तज्ज्ञ परीक्षकांच्या समितीकडून करण्यात आली, तसेच त्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या चर्चासत्रामध्ये राज्यातील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती. विशेषतः तेथील इंग्रजी विभाग प्रमुखांनी आपल्या जिल्ह्यातील उत्कृष्ट संघ चर्चासत्रात सहभागी होईल यासाठी विशेष प्रयत्न केले. उपक्रमशील शिक्षकांची निवड करतानाच, त्यांच्याकडून सादरीकरण करण्याची तयारीही करून घेतलेली दिसून आली. अनेक जिल्ह्यांतील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांचे इंग्रजी विभाग प्रमुख स्वतः चर्चासत्रात सहभागी झाले होते. त्यांनी कार्यक्रमाच्या आयोजनातही महत्त्वाची भूमिका बजावली.

या चर्चासत्राची प्रायोजक संस्था दलितमित्र कदम गुरुजी सायन्स कॉलेज, मंगळवेढा यांनी हा राज्य स्तरावरील उपक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व दृष्टीने मदत केली. सर्व पातळ्यांवर त्यांनी केलेली व्यवस्था अतिशय उत्तम होती. संस्थेचे अध्यक्ष तसेच सर्व पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक व कर्मचारी हिरिरीने या चर्चासत्राच्या आयोजनात सहभागी झाले होते. आदरणीय डॉ. सुभाष कदम, सचिव, श्रीमती प्रियदर्शनी कदम-महाडीक, प्राचार्य रवी काशिद, अशफाक शेख यांनी केलेली मदत उल्लेखनीय आहे.

या एक दिवसीय चर्चासत्राच्या माध्यमातून महाराष्ट्रात इंग्रजी विषयाचे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना निश्चितच मोठी प्रेरणा मिळाली आहे, तसेच त्यांच्या कामाला राज्यासमोर मांडण्यासाठी या निमित्ताने एक हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले.

❑❑❑

**(पृष्ठ क्र. १३ वरून)**

### (क) विसर्गापूर्वीच्या (विसर्गयुक्त) अक्षराचे इकार–उकार ऱ्हस्व :

विसर्गापूर्वीच्या अर्थात विसर्गयुक्त अक्षरांचे इकार–उकार ऱ्हस्व असतात; म्हणजेच ज्या अक्षराला विसर्ग लागलेला असतो ते अक्षर ऱ्हस्व असते. उदाहरणार्थ, उःशाप, चतुःशृंगी, चतुःसीमा, दुःख, दुःखान्त, दुःशासन, मातुःश्री, भुभुःकार

निःसत्त्व, निःस्पृह, निःशेष, निःश्वास, निःसंग, निःपात इत्यादी.

### (ड) जोडाक्षरापूर्वीचे इकार–उकार ऱ्हस्व :

मराठी शब्दातील जोडाक्षरापूर्वीच्या अक्षरांचे इकार–उकार ऱ्हस्व असतात. मात्र संस्कृत शब्दातील जोडाक्षरापूर्वीच्या अक्षरांचे इकार–उकार मुळाप्रमाणे ऱ्हस्व किंवा दीर्घ लिहावेत. उदाहरणार्थ,

(१) किल्ला, गिऱ्हाईक, चिल्लर, चित्त, चित्रपट, जिद्द, तिऱ्हाईत, दरिद्री, नादिष्ट, प्रतिष्ठा, पिस्ता, पुण्य, पुष्कळ, भिस्त, मित्र, निम्मा, शिस्त, विरुद्ध, साहित्य, सहिष्णुता इत्यादी.

(२) इच्छुक, उत्तर, उत्पन्न, उत्सव, कुष्ठ, कुस्ती, खुद्द, संतुष्ट, सुस्त, सुष्ट, शुद्ध, युक्ती, युक्तिवाद इत्यादी.

**अपवाद :**

(१) काही संस्कृत शब्द या नियमास अपवाद आहेत. या शब्दांतील जोडाक्षरापूर्वीचे इकार–उकार दीर्घ आहेत. उदाहरणार्थ, ईश्वर, ऊर्ध्व, कीर्ती, ग्रीष्म, तीव्र, तीक्ष्ण, दीप्ती, नावीन्य, पूज्य, प्रीत्यर्थ, फूत्कार, भीष्म, मूल्य, मूल्यवान, प्रावीण्य, स्फूर्ती, शूद्र, शून्य, सूक्ष्म इत्यादी.

❑❑❑

# शाळेच्या सहलीतील सजगता

**डॉ. गोविंद नांदेडे**
पूर्व शिक्षण संचालक, पुणे.

*शालेय जीवनातील सहली, हा एक अविस्मरणीय आनंदी अनुभव असतो, मात्र काही जोखमीच्या ठिकाणी सहली नेल्यास अपघाताची शक्यता असते. विद्यार्थ्यांचा जीव धोक्यात येऊ शकतो. हे टाळण्यासाठी सहली कोठे न्याव्यात, कोणती काळजी घ्यावी आणि सहलीचा अनुभव आनंददायी कसा करावा, याबाबतच्या मौलिक सूचना या लेखात दिल्या आहेत.*

शालेय जीवनात सहल हा एक अविस्मरणीय असा आनंदी प्रसंग असतो. शाळेतील वर्गमित्र आणि आपले शिक्षक यांच्याबरोबर आल्हाददायक निसर्गसौंदर्याच्या सान्निध्यात अनुभवलेले सहलींचे दिवस आयुष्यभर पुनर्प्रत्ययाचा आनंद देत राहतात; परंतु या आनंददायी शैक्षणिक सहली आता मृत्यूच्या सावटाखाली दुःख आणि वेदनांची अनुभूती देत आहेत, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

नवीन वर्षाच्या प्रारंभालाच औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड शहरातील, साने गुरुजी विद्यालयातील प्रणव कदम आणि रोहन बेडवाल हे दोन विद्यार्थी रायगड जिल्ह्यातील काशीद समुद्रात बुडून मरण पावले. ही वार्ता वाचून महाराष्ट्राचे अवघे शिक्षणक्षेत्र दुःख–सागरात बुडाले. पालक व शिक्षकवर्ग यांच्यात आणि समाजात 'कशाला हव्यात या सहली, बंद करा हे सारे...' अशी टोकाची विचारधारा व्यक्त होत आहे. या शाळेचे पाच विद्यार्थी समुद्रात बुडाले होते; परंतु मुख्याध्यापक धैर्यशील केरे यांनी जीवरक्षकांच्या साहाय्याने कृष्णा पाटील, तुषार वाघ, रोहन महाजन या विद्यार्थ्यांचा जीव वाचवला. यातील दुर्दैवाची बाब अशी, की मृत्यू पावलेल्या प्रणव कदम या विद्यार्थ्याचे वडील सजन कदम त्याच शाळेत सेवक म्हणून कार्यरत आहेत आणि ते सहलीत मुलांसोबत होते. त्यांचा एकुलता एक लाडका मुलगा प्रणव त्यांच्या डोळ्यांदेखत समुद्रात बुडत होता. आक्राळविक्राळ लाटेसोबत प्रणव समुद्रात लांब जाऊन बुडून दिसेनासा झाला. काही वेळाने त्याचा आणि रोहनचा मृतदेह हाती लागला. सोबत गेलेले विद्यार्थी आणि शिक्षक सुन्न होऊन गेले. आनंदासाठी सहलीला गेलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या दोन वर्गमित्रांच्या मृत्यूच्या सावटाखाली गावी परतावे लागले.

आता अशा लांबच्या सहलींना प्रतिबंध घालावा, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे. पालक आता उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये आपल्या पाल्यांना घेऊन निसर्गरम्य पर्यटनस्थळी जात आहेत, मग शाळांनी सहली काढायची काहीही गरज नाही, असाही एक सूर ऐकायला मिळत आहे. असे असले, तरी शैक्षणिक सहलींचे महत्त्व अमान्य करता येत नाही. शाळांनी आपल्या जवळच्या निसर्गरम्य डोंगर–टेकड्यांवर विद्यार्थ्यांना सहलीला घेऊन जावे. समुद्र, जलप्रपात, मोठ्या नद्या, अथांग जलाशय, मोठे पर्वत, डोंगर, भयावह दऱ्या अशा जोखमीच्या आणि घात, अपघात होतील अशा ठिकाणी सहलींचे आयोजन करू नये हेच हिताचे आहे.

माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांतील विद्यार्थी पौगंडावस्थेच्या वादळी कालखंडातून जात असतात. या वयातच साहस, शौर्य, धाडस आणि धैर्याच्या गोष्टी साकार करून काहीतरी आगळेवेगळे, भव्यदिव्य, चित्रपटातील नायकांसारखे विलक्षण कृत्य करून समवयस्कांना प्रभावित करण्याचे हे वय असते आणि नायक होण्याची प्रवृत्ती कधीकधी जीवघेणी ठरते. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी लाजरे, बुजरे व हरणीच्या पाडसासारखे निरागस असतात. आपल्या शिक्षकांच्या नजरेच्या टप्प्याबाहेर कधी जात नाहीत. हे लहान विद्यार्थी आपल्या शिक्षकांच्या सूचनांचे अगदी तंतोतंत पालन करताना दिसतात. उच्च प्राथमिक व उच्च माध्यमिक शाळांतील इयत्ता सहावी ते बारावीचे विद्यार्थी; विशेषतः इयत्ता आठवी ते बारावीचे विद्यार्थी, पौगंडावस्थेचा वादळीकाळ संक्रमित असतात. अशा विद्यार्थ्यांना सांभाळणे हे शिक्षकांसाठी खूप कठीण आणि जोखमीचे काम असते.

हल्ली 'मोबाईल सेल्फी' नावाच्या मानसिक विकृतीने पछाडलेले विद्यार्थी धबधबा, डोंगरप्राय लाटा, जोखमीच्या दऱ्या-खोऱ्या, विशाल जलाशय अशा अतिधोक्याच्या ठिकाणी सेल्फी घेण्याच्या छंदापायी क्वचित प्राणाला मुकत आहेत. सहलींमध्ये विद्यार्थिसंख्या जेवढी मर्यादित असेल, तेवढी जोखीम कमी असते. दुर्घटना घडलेल्या साने गुरुजी विद्यालयाच्या सहलीत ८० विद्यार्थी सहभागी होते. एवढ्या विद्यार्थ्यांवर लक्ष ठेवणे शिक्षकांनाही खूप कठीण जाते. शिवाय पौगंडावस्थेतील विद्यार्थी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकांच्या सूचनांचे पालन तंतोतंत करत नाहीत. 'आम्हांला काहीही होत नाही सर... तुम्ही काळजी करू नका.' असे शिक्षकांनाच त्यांचे ऐकावे लागते. तीस-चाळीस वर्षांपूर्वी माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थीदेखील आजच्या प्राथमिक शालेय विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकांच्या निर्देशांचे पालन करत असत. हल्ली विद्यार्थी शिक्षकांच्या आदेशाचे पालन करताना दिसत नाहीत. एखाद्या शिक्षकाने रागात निर्देश दिल्यास, दुसऱ्या दिवशी पालक त्या शिक्षकांची तक्रार करतात. त्यामुळे आम्ही बेशिस्त पिढी निर्माण करत आहोत की काय ही भीती वाटते. आपल्या संस्कारातील सामर्थ्य कमी होत आहे की काय अशीही भीती वाटायला लागते.

शालेय सहली जबाबदार सामाजिकतेचे कसदार संस्कार करत असतात. घरापासून दूर राहताना जबाबदारीची जाणीव आणि उत्तरदायित्वाच्या कसदार संस्कारांसाठी शालेय सहली अनिवार्य आहेत. सहली शाळांनी बंद कराव्यात असे म्हणणे म्हणजे रस्ते-अपघात होतात, म्हणून प्रवासच न करण्यासारखे आहे; परंतु शाळा, शिक्षक आणि मुख्याध्यापकांनी मात्र काही दक्षता घेणे आवश्यक आहे.

(१) शाळा परिसरात २० ते २५ किमी परिघातील निसर्गस्थळांना प्राधान्याने भेटी द्याव्यात.

(२) जलजोखीम असलेले समुद्रकिनारे, जलाशय, जलप्रपात म्हणजे धबधबे, डोंगर-दऱ्या, वर्दळीचे महामार्ग अशा ठिकाणच्या सहली शक्यतो टाळाव्यात.

(३) मर्यादित विद्यार्थ्यांच्या वर्गनिहाय आनंद सहली आयोजित कराव्यात. शिक्षकांनी सहलीत १०-१० विद्यार्थ्यांचे गट करून त्या गटाचे पालकत्व स्वीकारावे व काळजी घ्यावी.

(४) सहलींच्या माध्यमातून जबाबदारीची जाणीव, सहकार्य, आदराची भावना, सदाचार ही

**(पृष्ठ क्र. ४० वर)**

# 'अमेरिका' - एक रम्य अनुभव

**डॉ. लतिका भानुशाली**
मुंबई.
भ्रमणध्वनी : ९३२२२०७८७८

*एकदा तरी परदेश वारी करावी, असे अनेकांना वाटते; पण प्रत्येकाला अशी संधी मिळेलच असे नाही. परदेश वारीचा प्रवास प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी व्हिसा मिळवणे, हे दिव्यकर्म असते. लेखिकेने अमेरिकेची वारी केली. त्यांना व्हिसा मिळवताना कशा अडचणी आल्या, प्रवास कसा झाला, अमेरिकेत काय काय पाहिले अशा अनेक गोष्टींसह सगळा अनुभव लेखात कथन केला आहे.*


'अमेरिकेला जात आहात? वा! वा! एकदा बघूनच या तो देश, म्हणजे प्रगती व विकास कशाला म्हणतात ते कळेल.'

'अमेरिकेसारख्या मुर्खांच्या देशात जाऊन काय बघायचंय? मठ्ठ माणसांचा देश आहे तो.'

'नायगरा पाहिल्याशिवाय अमेरिका सोडू नका.'

'युरोपचे सौंदर्य डोळ्यांसमोर ठेवून अमेरिकेला गेलात तर भ्रमनिरास होईल.'

अशा वेगवेगळ्या परस्पर विरोधी विधानांच्या फैरीच अमेरिकेला पहिल्यांदा जाणाऱ्या आमच्यावर डागण्यात आल्या, त्यामुळे प्रत्यक्ष त्या भूमीवर पाऊल ठेवून स्वतःच्या डोळ्यांनी पाहत नाही, अनुभवत नाही, तोपर्यंत कुठलाही पूर्वग्रह मनात निश्चित करायचा नाही; हे प्रथम नक्की केले.



अमेरिकन व्हिसा मिळवणे हे एक दिव्यकर्मच असते. कोणत्या कारणाने व्हिसा नाकारला जाईल हे सांगता येत नाही. तिथे जाण्याची स्वप्ने घेऊन सकाळी पाचपासून रांगेत उभी असलेली माणसे पाहिली, तेव्हा हे पाणी काही वेगळेच आहे याची खात्री पटली. रोज अमेरिकेच्या व्हिसासाठी हजारोंच्या संख्येने रांगा लावणारी सुशिक्षित, सुसंस्कृत माणसे मूर्ख कशी असतील?

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या बोस्टन प्रोव्हिडन्स येथे भरणाऱ्या सोळाव्या अधिवेशनात 'ग्रंथाली' प्रकाशन संस्थेतर्फे माझ्या नावाची नोंदणी झाली होती. पुस्तकाच्या स्टॉलवर लोकांशी संवाद साधून नवीन पुस्तकांची माहिती देणे, अमेरिकास्थित भारतीय मंडळींशी त्यानिमित्ताने संवाद साधणे, शिवाय 'पुस्तक प्रकाशन समारंभ' व अमेरिकास्थित, जर्मनीस्थित व मुंबईस्थित अशा पाच लेखकांच्या पुस्तकांवर आधारित चर्चासत्रे वॉशिंग्टन डी. सी. जवळ कोलंबिया येथे लेखकांच्या उपस्थितीत घेणे, अशा जबाबदाऱ्या माझ्याकडे होत्या.

माझी महाविद्यालयातील कायमस्वरूपी नोकरी असल्याने, मी भारतात नक्कीच परतणार याची खात्री पटून माझा व्हिसा व्हायला अडचण आली नाही; पण मला त्या देशात माझ्या यजमानांबरोबरच जायचे होते. त्यांना तिथे जाण्यासाठी सबळ कारण नव्हते.

व्हिसा काऊंटरवरच्या बाईने अत्यंत खडूसपणे यजमानांना 'तुमचा बिझनेस व BMM यांचा संबंध नाही' असे उत्तर दिले. वार्षिक उत्पन्न विचारून

झाले. BMM चा फुलफॉर्म विचारून झाला, तरी तिचा नन्नाचा पाढा संपेना.

शेवटी मी हुकमी एक्का बाहेर काढला 'आम्हां दोघांना फिरण्याची प्रचंड आवड आहे. भारताचा कानाकोपरा पाहून झालाय. आता जग बघण्याची इच्छा आहे. BMM च्या निमित्ताने तुमच्या देशापासून परदेश पर्यटनाची सुरुवात झाली, तर मी आपली आभारी राहीन. तुमचा जगप्रसिद्ध 'नायगरा' बघणे हे माझे स्वप्न आहे. नायगऱ्याचे 'थ्रील' मी माझ्या नवऱ्याशिवाय कसे अनुभवणार?'

''किती वर्षे झाली लग्नाला?'' काचेपलीकडून प्रश्न.

''२२ वर्षे'' माझे काचेअलीकडून उत्तर.

२२ वर्षांनंतरसुद्धा जोडप्यामध्ये असलेला जिव्हाळा (जो बहुतेक अमेरिकेत दुर्मीळ असावा) पाहून बाई जरा गहिवरल्या असाव्यात. कौतुकमिश्रित भाव चेहऱ्यावर आणून, डोळे बारीक करून 'वा ! वा !' अशा अर्थाने त्यांनी मान डोलावली. मग डोळे मोठे करून यजमानांकडे बघितले आणि ''लकी चॅप, वेलकम टू युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका'' असे म्हणत आमचे पासपोर्ट व्हिसासाठी ठेवून घेतले आणि एकदाचा तो दिव्य व्हिसा पदरात पडून आम्ही अमेरिका वारी करायला सज्ज झालो.

इथे मुंबापुरी पावसात बुडालेली, लोकल ट्रेनने माना टाकलेल्या, जागोजागी पाणी पसरलेले आणि खड्डे, चिखल यांचे साम्राज्य. त्यामुळे अमेरिकेच्या ईस्ट कोस्टवर आता हवामान कसे असेल? गरम कपडे बरोबर घ्यावेत की नाहीत? खाण्याचे पदार्थ नेले, तर चेक-इनच्या वेळी ठेवतील की फेकतील? सामान निर्धारित वजनापेक्षा जास्त झाले, तर दंड कितीच्या प्रमाणात आकारला जातो? असे असंख्य प्रश्न गराडा घालून उभे होते.


शेवटी अनुभवी मंडळींशी संवाद साधून एकदाची बॅग भरली आणि मुंबई-पॅरिस-बोस्टन प्रवास करायला आम्ही तयार झालो. रात्री ११ वाजता भारत सोडला. सकाळी युरोपच्या हद्दीत प्रवेश केला आणि खाली दिसणाऱ्या दृश्याने झोपच उडाली. हिरव्यागार कुरणांचे, शेतांचे आखीवरेखीव चौकोनी, षटकोनी, त्रिकोणी, अष्टकोनी पट्टे नजर पोहोचत नव्हती तिथपर्यंत पसरले होते. कोठे घरांच्या पुंजक्यामध्येच गच्च रानांचे, उंच झाडांचे, जंगलांचे पट्टे, तर कोठे पायथ्याशी हिरवेगार गवत व माथ्यावर बर्फ अशी पर्वतराजी! त्यामधून वाहणाऱ्या नद्या, डोंगरांच्या कुशीत वसलेले निळेशार तलाव, जणू कोंदणात बसवलेला अंगठीतला हिरा! नजरेत किती साठवू? काय काय साठवू? अशी अवस्था झाली.

पॅरिसच्या विमानतळावर ५ तासांचा सक्तीचा आराम होता. घड्याळ ४ तास मागे केले आणि विमानतळावरील नवलाई न्याहाळायला सज्ज झालो. प्रचंड मोठे विमानतळ A to Z पर्यंतचे सेक्शनस्. एका सेक्शनमधून दुसऱ्या सेक्शनमध्ये जायला आलिशान काचेची मेट्रो, विमानतळावरील पंचतारांकित हॉटेल, खाण्याचे स्टॉल्स, कॉफी शॉप्स, पुस्तकांची दुकाने, चॉकलेट्सची दुकाने, सुगंधी अत्तरे बाटल्यांमध्ये आकर्षकपणे मांडून ठेवलेली, पॅरिसच्या वेगवेगळ्या सुप्रसिद्ध वारुणींचे दर्शन आणि हे सर्व विकण्यासाठी आकर्षक पेहराव केलेले विक्रेते. सर्व चित्रमय वाटत होते. वस्तूंना हात लावण्याची हिंमतच होत नव्हती. युरोचा भाव ऐंशीच्या आसपास! रुपयाच्या गणिताने डोळे पांढरे होत होते. त्यामुळे विंडो शॉपिंगवर समाधान मानत 'बोस्टन' उड्डाणासाठी सज्ज झालो.

अटलांटिक महासागरावरचा ८ तासांचा प्रवास पार पाडायचा होता. समुद्रातील विविध बेटे व त्यांचे आकार समोरच्या स्क्रीनवर दिसत होते. त्यानुसार

खाली आकार शोधण्याचे काम सुरू होते. स्क्रीनवरचा आकार व खाली समुद्रातील आकार नेमका ओळखता आला, की आनंद गगनात मावेनासा होत होता. शाळेत शिकलेला भूगोल प्रत्यक्षात अनुभवत होते. 'बर्म्युडा ट्रँगल' आठवून उगीचच धडधडायला लागले.

एकदाचे बोस्टनला 'लँड' झालो आणि अमेरिकेच्या भूमीत आम्ही पाऊल ठेवले. याच बोस्टनमध्ये अमेरिकन स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारी अध्याय लिहिला गेला. ब्रिटनहून आणलेले चहाचे खोके अमेरिकन स्वातंत्र्यसैनिकांनी इथल्या बंदरात बुडवले. 'बोस्टन टी पार्टी' म्हणून या ऐतिहासिक घटनेची नोंद अमेरिकेच्या इतिहासात नोंदवलेली आहे.



इथल्या सर्व विमानतळांची खासियत आहे, की सामान घेऊन लांबपर्यंत जावे लागत नाही. सर्वच विमानतळांवर 'कार पार्किंग' व 'कार रस्ते' प्रचंड सोयीचे आहेत. बॅग उचलून धरण्याची वेळ येतच नाही. बॅग चाकांवर चालत सरळ गाडीतच जाते. लोकांसाठी असलेल्या या सुविधा पहिल्या, मग इतर गोष्टी. रस्ता ओलांडताना चालणारा माणूस महत्त्वाचा! तो रस्त्यावरील विशिष्ट बटण दाबून ट्रॅफिक थांबवू शकतो. चालणारा माणूस असेल, तर गाड्या स्वतःहून थांबतात.

जुन्या ब्रिटनमधील घरांची आठवण करून देणारे, बरेचसे चॉकलेटी रंगाने रंगलेले आखीवरेखीव शहर म्हणजे 'प्रोव्हिडन्स'. तेथील छोट्या टेकडीवर वसलेली सतराव्या व अठराव्या शतकातील घरे, ही या शहराचा ऐतिहासिक ठेवा आहेत. अत्यंत श्रीमंत लोकांची घरे म्हणून ही छोटी टेकडी ओळखण्यात येते. संपूर्ण शहराचे विहंगम दर्शन देणाऱ्या याच टेकडीवर ब्रिटनवरून वसाहत करण्यासाठी आलेल्या लोकांनी बस्तान ठोकले, त्यामुळे इथे फिरताना युरोपचा भास होत राहतो. सकाळी ५.३० वाजता स्वच्छ ऊन आणि रात्री ८.३० पर्यंत स्वच्छ सूर्यप्रकाश याची नवलाई सर्वांनाच वाटत होती. नदीला 'देवी' न बनवता तिचे नैसर्गिक सौंदर्य टिकवून शहराच्या सौंदर्यात भर कशी घालावी, ते या लोकांकडून खरेच शिकण्यासारखे आहे. प्रोव्हिडन्स शहर हे एखाद्या स्वप्ननगरीतले शहर आहे. 'गव्हर्नर्स हाऊस' ही प्रेक्षणीय वास्तू संपूर्ण संगमरवरी दगडात बांधलेली आहे. हा दगड ताजमहालाच्या तोडीचा आहे, असा दावा आमचा हॉटेल मॅनेजर थॉमस याने केला. शहराच्या एका बाजूला वाहणाऱ्या नदीच्या किनारी असलेले रस्ते हिरवळीने फुललेले होते. ठिकठिकाणी तरंगत्या कुंडीतील फुलांनी हॉटेल व रस्ते सजलेले दिसत होते. रात्री १० नंतर फुलणारी तरुणाई शहराची रसिकता अधोरेखित करत होती.

BMM साठी चार दिवस याच शहरात मुक्काम असल्याने आमच्या हॉटेल काऊंटरवरचा मॅनेजर थॉमस हा आमचा मित्रच झाला होता. काऊंटरवर एकावेळी एकानेच उभे राहायचे, गर्दी करायची नाही, 'एक्सक्यूज' नाही; 'शिस्त म्हणजे शिस्त' या गोष्टी अतिशय नम्रपणे व प्रेमाने त्याने आम्हां सर्वांना शिकवल्या, ज्याचा पुढील प्रवासात खूपच उपयोग झाला. या अधिवेशनाच्या निमित्ताने सर्व हॉटेल्स मराठी माणसांनी तुडुंब भरलेली होती. सर्वत्र साड्या, चुडीदार, पैठणी, पंजाबी ड्रेसेस, झब्बे–कुडते अशा भारतीय पेहरावातील स्त्रीपुरुष पाहून आपण भारतातच असल्याचा भास होत होता, पण

स्वच्छ, खड्डेविरहित आखीवरेखीव रस्ते व रस्त्यावरील काळीगोरी माणसे पाहिल्यावर मात्र आपण अमेरिकेच्या भूमीवर असल्याची जाणीव होत होती. या अधिवेशनाला अमेरिकेच्याच नव्हे; तर जगाच्या कानाकोपऱ्यातून मराठमोळी मंडळी जमा झाली होती. जणू तिथल्या मराठी बांधवांचा दिवाळी मेळावाच!

प्रोव्हिडन्सचा कन्व्हेंशन हॉल म्हणजे मोठे स्पोर्टस कोर्टच होते. एका वेळेला ८,००० प्रेक्षक बसू शकतील एवढी आसनक्षमता होती. या अधिवेशनासाठी जवळजवळ सव्वातीन हजार मराठी बांधव एकत्र आले होते. त्यांना बांधणारा सेतू होता मराठी भाषा आणि मराठी संस्कृती! इतक्या लोकांची केलेली भोजनव्यवस्था हा उत्कृष्ट व्यवस्थापनाचा नमुनाच होता. दीड-दोन हजार माणसे एका वेळी जेवू शकतील, एवढी टेबल्स तिथे होती. सुहास्य वदनाने स्वागत करणाऱ्या, पैठणी ल्यालेल्या आणि मराठमोळ्या साजशृंगाराने सजलेल्या ललना, प्रवेशद्वारापाशी काढलेल्या सुबक रांगोळ्या, कुठे टेबलावर उभारलेली छोटी गुढी, तर कुठे सुविचार लिहिलेले छोटे स्टँड, तर कुठे केळीचे पान (प्लॅस्टिकचे) असे जंगी स्वागत होते. अगदी नागपूरच्या वडाभातापासून, अळूची पातळ भाजी ते कांदाभजी, थालीपीठ, वडापाव, मिसळ, वांग्याचे भरीत, आंबावडी, सोलकढी, कोकणी चिकन-वड्यांपर्यंतचा सगळा महाराष्ट्र तिन्ही दिवस ताटात सजून तयार होता. परदेशी भूमीवर आपलेपणा देणारा हा मेन्यू 'फील ॲट होम' हे ब्रीदवाक्य जिवंत करत होता.

अगदी ५०-६० वर्षांपूर्वी अमेरिकेत आलेल्या मंडळींपासून ते आता अमेरिकेत स्थिरावू पाहणाऱ्या मंडळींपर्यंत, सर्व जण आवर्जून हजर होते. परकीय भूमीवर समभाषिक लोक भेटणे, त्या निमित्ताने आपली भाषा संस्कृती टिकवणे, ती परंपरा पुढच्या पिढीपर्यंत समर्थपणे पोहोचवणे हे काम BMM च्या निमित्ताने सहज पार पडताना दिसत होते. मुख्य म्हणजे या अधिवेशनात कोणीही आधुनिक पेहराव केलेला नव्हता. अमेरिकन ॲक्सेंटमध्ये मराठी-इंग्रजी बोलणाऱ्या 'Born and Brought up in America' पिढीनेसुद्धा पारंपरिक वेशच धारण केला होता, हे वैशिष्ट्यपूर्ण होते. टेबलावर जेवताना एक डॉलरमध्ये (भारतीय ६० रुपये-तत्कालीन भाव) गजरा विकणाऱ्या ललना लक्ष वेधून घेत होत्या, तर बाहेर स्टॉलवर २ डॉलरमध्ये पानाच्या गाडीवर विडा खायला तुडुंब गर्दी उसळली होती. मराठी माणसाचे या दोन्ही गोष्टींवर मनापासून प्रेम! अमेरिकेत तरी ते कसे बरे आटेल!

मराठी नाटक, सिनेमा, संगीत, दूरदर्शन मालिका, साहित्य, विज्ञान, क्रीडा या क्षेत्रांतील दिग्गजांनी कार्यक्रमाला हजेरी लावली होती. तीन दिवसांचा हा कार्यक्रम म्हणजे सातासमुद्रापलीकडे असणाऱ्या मराठी रसिक मंडळींसाठी, आपल्या भूमीतील संस्कृतीचा आनंद परकीय भूमीत घेण्याची मोठी संधीच होती. एरवी अमेरिकन जीवनपद्धतीनुसार कामाच्या बाबतीत काटेकोर असणारी ही मंडळी, सुट्ट्या घेऊन बायकोमुलांसह आपापल्या गाड्या घेऊन प्रोव्हिडन्समध्ये आदल्या दिवसांपासूनच धडकली होती. भारतातूनसुद्धा अनेक जण आले होते. जवळजवळ ८,००० माणसे सहज बसू शकतील, अशी सोय असलेल्या गोलाकार हॉलच्या बाह्य गोलामध्ये विविध स्टॉल्सची व्यवस्था करण्यात आली होती. पैठण्या, शाही दागदागिने (काही अस्सल सोन्याचे, तर काही इमिटेड ज्वेलरी) पारंपरिक भारतीय पोशाखाच्या स्टॉलवर जशी गर्दी होती, तशीच गर्दी 'ग्रंथाली'च्या पुस्तकांच्या स्टॉलवर होती हे विशेष. या वर्षी 'ग्रंथाली'ने इ-बुक स्वरूपात बावीस पुस्तकांची सीडी लोकांना सप्रेम भेट म्हणून दिली. तिथे जन्माला आलेली मराठी मुले मराठी बोलू शकतात, पण वाचू

शकत नाहीत. त्यामुळे आपल्या भाषेपासून दुरावत जाणाऱ्या पिढीसाठी पुस्तके ऑडियो स्वरूपात आणणे गरजेचे आहे, असे मत अनेकांनी नोंदवले, शिवाय अमेरिकेत ऑफिस ते घर हा पल्ला बऱ्याचदा खूप मोठा असतो व तो स्वतःच्या कारने पार केला जातो. या प्रवासात अशी ऑडिओ स्वरूपातील पुस्तके ऐकायला मिळाली, तर प्रवास सत्कारणी लागेल व भाषेशी असलेले ऋणानुबंध दृढ होतील, अशी प्रतिक्रिया बऱ्याच वाचकांनी दिली. ऑडियो स्वरूपातील पुस्तकांना असलेल्या या मागणीकडे प्रकाशकांनी फार काळ दुर्लक्ष केले; तर पुढील काळात परदेशात पुस्तक विक्री करणे कठीण होऊ शकेल हे सत्य आहे.

आपल्या मातृभूमीपासून दूर असणाऱ्या प्रत्येकाच्या मनात आपली भाषा, आपली संस्कृती, आपले लोक, आपली भूमी यांविषयीचा एक हळवा कोपरा जागा असतो. निमित्त मिळाले, की माणूस भूतकाळातील आठवणींना पुन्हा उजाळा देण्याचा प्रयत्न करतो व BMM सारख्या अधिवेशनांना उपस्थित राहून, ही कमतरता भरून काढण्याचा प्रयत्न करतो हे प्रकर्षाने जाणवले.

या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक प्रकारच्या रसिकाचे समाधान होईल, असे कार्यक्रम आखले होते. उद्घाटन समारंभासाठी महेश मांजरेकर, भारताचे न्यूयॉर्कमधले काउन्सेलर जनरल ज्ञानेश्वर मुळे, प्रोव्हिडन्स शहराचे महापौर अँजेल टॅव्हेरास, अधिवेशनाचे मुख्य वक्ते बाळ फोंडके इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

नृत्य, समूहनृत्ये, नाटके, प्रहसने, मुलाखती, नाट्यसंगीत, हास्यनाटिका अशा अनेक बहारदार कार्यक्रमांची रेलचेल या निमित्ताने अमेरिकास्थित मराठी मंडळींनी अनुभवली. मनोरंजनाबरोबर बिझनेस कॉन्फरन्स, एज्युकेटर्स समिट असे शैक्षणिक आदान-प्रदान कार्यक्रमदेखील आयोजित केले होते हे विशेष. या 'इंडो-युएस एज्युकेटर्स समिट' मध्ये हॉर्वर्ड युनिव्हर्सिटी, मॅसेच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नॉर्थ इस्टर्न युनिव्हर्सिटी यांसारख्या १५ शिक्षणसंस्थांचे प्रतिनिधी व महाराष्ट्रातील शिक्षणसंस्थांचे प्रतिनिधी यांचे चर्चासत्र आयोजित केले होते. यातून भारतीय विद्यार्थ्यांसाठी व विद्यापीठांसाठी बऱ्याच शैक्षणिक संधी उपलब्ध होतील यात शंका नाही.

या अधिवेशनात रसिकांची जी व्यवस्था करण्यात आली होती, त्याला तोड नाही. साडेतीन हजारांच्या आसपास माणसे एकत्र आली होती; पण कुठेही जेवणाचा घोळ नाही. कार्यक्रमांचा गोंधळ नाही. सगळे अत्यंत शिस्तीत पार पडले. प्रोव्हिडन्स शहराच्या रस्त्यावर ऐकू येणारे सनई, ढोल, ताशे, उभारलेली तोरणे, सजूनधजून, दागदागिने घालून रस्त्यावरून चालणारी मराठमोळी माणसे, असे मंगलमय वातावरण परदेशात अनुभवायला मिळणे हे खरेच विलक्षण होते. मायभूमीच्या आठवणीने कासावीस होणारा माणूस जिद्दीने, नेटाने आपली मायभूमीच परकीय भूमीवर काही काळ का होईना निर्माण करतो. ही त्याची आंतरिक भूक आहे, याचा प्रत्यय यातून आला. दोन वर्षांनी लॉस एंजलीस इथे भरणाऱ्या पुढच्या BMM अधिवेशनात पुन्हा भेटण्यासाठी एकमेकांचे निरोप घेऊन मराठी मंडळी आपापल्या अमेरिकन गावात परत गेली, ती प्रचंड आंतरिक ऊर्जा व उत्साह घेऊनच!

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या या अधिवेशनातील स्वागत, आपलेपणा मनात साठवत आम्हीदेखील अमेरिकेच्या अंतरंगात शिरण्यासाठी सज्ज झालो.

पारंपरिक कपड्यांची अमेरिकेतील नवलाई संपली आणि तोकड्या कपड्यांचे साम्राज्य सुरू झाले. मुलीला दोष द्यावा, तर आई तिच्यापेक्षा तोकडे कपडे घालून तयार, आईला दोष द्यावा तर आजी त्यापेक्षा अधिक! नजरेला सवय व्हायला दोनतीन दिवस लागले. मग लक्षात आले, की इतर वेळी प्रचंड थंडीमुळे सतत अंग

झाकून ठेवायला लागते, त्यामुळे दोन महिने मिळणाऱ्या या उन्हाला हे लोक अंगात मुरवून घेतात. आपल्या मध्यमवर्गीय संस्कारांमुळे नजर जरा बावचळते इतकेच!, पण स्वच्छतेच्या बाबतीत मात्र 'तू पुढे की मी?' अशी चढाओढ. संपूर्ण शहरात कुठेही कचरा नाही. भरभरून वाहणाऱ्या कचराकुंड्या नाहीत. डिस्नी वर्ल्डसारख्या ठिकाणी तर एकावेळी पाच लाखांपेक्षा जास्त माणसे एकत्रित आलेली, पण सार्वजनिक शौचालयांची स्वच्छता घरातील न्हाणीघरांना लाजवेल अशी होती.

''आय लव युवर पॅमित्याब बशॉना!'' इलियास, आमचा अमेरिकन टॅक्सी ड्रायव्हर जीव तोडून सांगत होता. जीभ दातांना स्पर्श न करता जेवढी आत ओढता येईल, तेवढी ओढत इंग्रजी बोलणे म्हणजे अमेरिकन इंग्रजी.

''तुमच्याकडे एकच गायिका आहे का? लॅट्या नावाची'' त्याने गुगली टाकली. तो सत्तरीच्या दशकातच अडकला होता. ''लता मंगेशकर या आमच्या राष्ट्राचा अभिमान आहेत, आता अनेक नवीन गायिका आल्या आहेत. भारतीय संगीत मेलडीच्या बरेच पुढे सरकले आहे.'' हे त्याला समजावताना आमच्या नाकी नऊ आले.

'सुन रुबीया, प्यार हो गया क्या करे?' त्याने मोबाईलवर 'मर्द' सिनेमातील अमिताभ-अमृता सिंग यांचे गाणे दाखवले व ऐकवले.

''याचे भाषांतर कराल का?''

"O my love, I have fall in love with you"

''दॅटस इंटरेस्टिंग ॲन्ड What about ?''

त्याने पुढच्या ओळी ऐकवल्या...

'सुनने को ये तरसता था दिल चल जल्दी से शादी करे'

I was dying to listen his sinces ages, lets get married.

"O lovely" तो अत्यानंदाने चित्कारला.

'तू मेरा टांगेवाला, मै तेरी टांगेवाली', मोबाईल किंचाळला. इलियान प्रश्नार्थक मुद्रेने भाषांतर ऐकायला उत्सुक. माझी बोबडी वळली. अमेरिकेच्या भूमीवर 'टांगेवाला' चे भाषांतर कोणी विचारेल याची मी तयारीच केली नव्हती.

भारताविषयीची उत्सुकता अमेरिकेत ठासून भरली आहे, याचा प्रत्यय पावलोपावली आला.

नायगरा धबधबा बोटीतून, लिफ्टमधून पाहून झाल्यावर तो हेलिकॉप्टरमधून पाहण्याचा योग भाग्यात होता. सोबतीला एक अमेरिकन आजोबा व त्यांचा नातू. आम्ही भारतातून आलो आहोत म्हटल्यावर त्यांची कळी खुलली. त्यांनी विविध गोष्टींविषयीची चौकशी आपणहून केली.


'मिड ऑफ द मिस्ट' या प्रवासात नायगराच्या पायथ्यापर्यंत बोटीने घेऊन जातात. पाण्याचा एवढा प्रचंड पसारा गोलाकार कमानीतून खाली येतो आणि आकाशातील चांदण्या वितळून आपल्या अंगावर येताहेत असेच वाटत रहाते. 'नायगरा'ला धबधबा म्हणणे हा त्याचा अपमान आहे. तो पाण्याचा प्रपात आहे.

न्यू जर्सीपासून ४०० मैल दूर बफेलो या शहराजवळ अमेरिकन संयुक्त संस्थान (USA) व कॅनडा यांच्या सीमारेषेवर जगातील हे विस्मयकारक आश्चर्य पाहण्यास मिळते. 'हॉर्स शू फॉल्स' हा धबधब्याचा एक भाग कॅनडाच्या बाजूला आहे, तर 'अमेरिकन फॉल्स' हा अमेरिकेच्या हद्दीत येतो. हे दोन्ही देश एका मोठ्या पुलाने जोडलेले आहेत. इतकी शांत सीमारेषा पाहून भारत-पाकिस्तानची धुमसणारी, कायम तणाव निर्माण करणारी सीमारेषा आठवली आणि मन विषण्ण झाले. पूर्वी हा धबधबा एकाच व्हिसावर दोन्ही बाजूंनी पाहता यायचा; पण ९/११ नंतर या पुलावरून कॅनडात जायला स्वतंत्र व्हिसा लागतो. 'हॉर्स फॉल्स् शू'ची उंची १७३ फूट असून तो २,६०० फूट लांब आहे, तर 'अमेरिकन फॉल्स'ची उंची ८० ते १०० फूट असून

लांबी १,०६० फूट आहे. या धबधब्यापासून १८७ मेगावॅट एवढी वीजनिर्मिती होते.

धबधब्याचे सर्व रंगरूप अनुभवून बाहेर आलो. प्रचंड भूक लागलेली, पिझ्झा, बर्गर नको वाटत होते आणि चमत्कारच झाला. समोर 'जैन फूड अवेलेबल', पावभाजी, पुलाव, Indian Food (भारतीय जेवण) 'पंजाबी ढाबा' असे बोर्ड दिसले. भारतीयांसोबत अमेरिकन माणसांनी हे ढाबे पूर्ण भरलेले होते. चमचमीत भारतीय पदार्थांची चव एकदाची अमेरिकन लोकांना कळली म्हणायची!

कुठेही रांग लावायची वेळ आली, तरी लहान मूल असलेल्यांना पहिला नंबर. प्रत्येक काऊंटरच्या समोर पिवळी रेषा आखलेली. पुढच्याची ऑर्डर पूर्ण झाल्याशिवाय पिवळीरेषा ओलांडायची नाही, हा अलिखित नियम. कारमध्ये लहान मुले मांडीवर घेणे कायद्याने बंधनकारक. त्यांच्यासाठी सीटला वेगळ्या बकेट लावलेल्या असतात. बाई गरोदर असताना पोलीस घराची पाहणी करून जातात. येणाऱ्या बाळासाठी सोयीसुविधा आहेत का, आईवडील त्याची काळजी घ्यायला सक्षम आहेत का, हे पाहायला. तसे जर नसेल, तर बाळाचा ताबा सरकार घेते. मुले ही राष्ट्रीय संपत्ती मानली जातात. बारा वर्षांपर्यंतच्या मुलांना कारमध्ये बसवताना विशिष्ट सीट बकेटवरच बसवावे लागते. घरी काम करताना मुलाला ओट्यावर उभे केल्याने, एका भारतीय बाईची तक्रार तिच्या अमेरिकन शेजारणीने केली, तर तिचे मूल पोलीस घेऊन गेले. शेवटी दोन महिन्यांनी तिने 'मला हे माहीत नव्हते. भारतात असे नियम नाहीत', हे पटवून मूल ताब्यात घेतले. मला भारतात पुलाजवळ, सिग्नल खाली झोपणारे, हॉटेलात काम करणारे बालकामगार आठवले.



अमेरिकेने कितीही दावा केला, की रंगभेद, वर्णभेद नाही; तरी सामाजिक जीवनात वावरताना तो जाणवतोच. काळ्यांचे वेगळे गट आपापल्या मस्तीत; गोऱ्यांचे वेगळे गट त्यांच्या त्यांच्यात. काळ्यांच्या वसाहतीत गोरे राहत नाहीत. गोऱ्यांच्या वसाहतीत काळे राहत नाहीत. इथे चार वर्ण अलिखित आहेत. काळे–गोरे, पित्तवर्णीय, मिचमिच्या डोळ्यांचे आशियाई व पाकिस्तानी, भारतीय निमगोरे लोक.

अमेरिकेच्या बाजारपेठा या चिनी वस्तूंनी भरून गेल्या आहेत. 'न्यूयॉर्क सिटी दर्शन'साठी चिनी एजंट व त्यांच्या बसेस यांचीच दादागिरी चालते. मधे मधे गुज्जुभाई पटेल एजंट तोडक्या–मोडक्या हिंदीत आपल्याला भारतीयत्वाचा हवाला देऊन, भावनात्मक आवाहन करतात आणि आपण त्याला नकळत बळी पडतो. अमेरिकन बाजारपेठांना आता पूर्वीची शान राहिलेली नाही, असे अनेक भारतीयांचे म्हणणे आहे. ९/११ पूर्वीची अमेरिका व आताची मंदीच्या उंबरठ्यावरची अमेरिका यात जमीन–अस्मानाचा फरक आहे.

न्यूयॉर्क हे मोठमोठ्या गगनचुंबी इमारतींचे शहर आहे. बहुतेक इमारती पन्नास किंवा त्याहून अधिक मजल्यांच्या आहेत. 'ट्विन टॉवर' पाडल्यानंतर त्याचे पुन्हा बांधकाम झालेले आहे. मृतांची आठवण म्हणून नवीन टॉवरच्या बाजूला स्मशानभूमी आहे. या आपत्तीचे चित्रण असलेली चित्रफीत तिथे प्रवाशांना दाखवली जाते. आता भारतीयांना तसे टॉवरचे आकर्षण राहिले नाही; पण तुरळक लोकसंख्या असलेल्या युरोपात मात्र घरे कमी उंचीची असल्याने, अगदी रस्त्यावर

आडवे पडून उंच इमारतींचे फोटो काढणारे युरोपिअन सर्वत्र दिसत होते.

न्यू जर्सी म्हणजे दुसरा भारतच आहे. इथे Zero Crime Rate आहे. या भारतीय वस्तीतील गुन्हेगारीचे प्रमाण शून्य आहे. त्यामुळे काळ्यांच्या वस्तीत जसे सदैव पोलीस तैनात असतात, तसे इथे नाही. पानाच्या गाडीपासून, पाणीपुरीवाल्यापर्यंत, भोजनालय, केशकर्तनालय अशा फलकांपासून 'जमवानू मळशे, शुद्ध देशी घी ना फुलका मळसे' अशा पाट्या हॉटेलबाहेर लावल्या आहेत. इथे इतर अनेक देशवासीयांनी भारतीयांप्रमाणेच आपापल्या नगरी उभ्या केल्या आहेत.

'नासा'ला भेट देणे हा खरेच एक अविस्मरणीय अनुभव आहे. 4D इफेक्ट असलेले सिनेमे तुम्हांला थेट अंतराळात घेऊन जातात. गॅलेक्सीमध्ये फिरवून आणतात. अंतराळवीर आकाशात काय करतात; याची सगळी उत्तरे या भेटीत मिळतात. 'नासा' म्हणजेच कॅनडी स्पेस सेंटर. चंद्रावर उतरलेले यान, ज्या छोट्या मोटारीतून नील आर्मस्ट्राँग व ऑल्ड्रीन यांनी चंद्रावर फेरी मारली ती गाडी, चंद्रावरचा दगड या सर्व गोष्टी तशाच ठेवल्या आहेत. अपोलो यानाचा उड्डाणाचा अनुभव प्रत्यक्ष कंट्रोलरूममध्ये बसून देतात. कंट्रोलरूमच्या स्क्रीनवर उड्डाण चालू असते. आता एकेका खुर्चीवर लाईट टाकला जातो. त्या वेळी ती माणसे आपापसात काय बोलतात, त्यांचे आवाज कानावर येतात व जणू या ऐतिहासिक घटनेचे आपण साक्षीदार होतो. अपोलो (Eleven) हे महाकाय यान उघडे करून प्रेक्षकांसाठी तसेच ठेवलेले आहे. भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र या विषयांतील तज्ज्ञांसाठी 'नासा' भेट म्हणजे पंढरीची वारीच होय.

'डिस्नीलँड' हे लहान मुलांना नव्हे; तर आबालवृद्ध, तरुण-तरुणी सर्वांनाच वेड लावते. मोठ्या मोठ्या कार्टुनच्या बाहुल्या रस्त्यावर परेड करत नाचतात. पऱ्यांच्या राज्यात गेल्यासारखे वाटते. मोठमोठ्या रोलर कोस्टरमध्ये बसवून एकेका राज्यात नेतात. कधी भुतांच्या नगरीत, तर कधी बाहुल्यांच्या राज्यात, तर कधी खेळांच्या दुनियेत. सगळेच अद्‌भुत व अविश्वसनीय आहे.

डिस्नीलँडच्या 'ॲनिमल किंगडम'मध्ये सर्व जगातील जंगले उभी केली आहेत. मैलोनमैल पसरलेले गवताळ प्रदेश, त्यात फिरणारे सिंह, उंट थेट आफ्रिकेला नेतात. भारताचा 'माऊंट एवरेस्ट' उभा केला आहे. रोलरकोस्टरमध्ये बसताना श्वास रोखूनच याचा आनंद घ्यावा लागतो. प्रचंड वेगाने जाणाऱ्या या गाड्या काळ मागे टाकतात असे वाटत राहते.

'युनिव्हर्सल स्टुडिओ' मध्ये जगप्रसिद्ध चित्रपटांचे देखावे आहेत. ज्यात तुम्हांला प्रत्यक्ष प्रवेश करता येतो. हॅरी पॉटरच्या राज्यात जाता येते. 'द ममी' सिनेमातील पिरॅमिडमध्ये जाता येते. बंद पेट्यांमध्ये असलेल्या या हजारो वर्षांपूर्वीच्या ममी तुमच्या मागे लागतात, तेव्हा मात्र पाचावर धारण बसल्याशिवाय राहत नाही. (Epcot) ॲपकॉट सेंटरमध्ये विविध देशांनी आपापल्या वैज्ञानिक व तांत्रिक समृद्धीचे व संपन्नतेचे दर्शन घडवले आहे. या प्रत्येक स्थळासाठी एकेक पूर्ण दिवससुद्धा पुरत नाही.

३,६०० एकरावर पसरलेले हे साम्राज्य पाहायला मन व शरीर दोन्ही रसिक असणे गरजेचे आहे. लॉसवेगासचे मिनी रूप असलेले शहर म्हणजे 'अटलांटिक सिटी'. रात्री सुरू होणारे हे विश्व, तिथले कॅसिनो, जुगारात ओतल्या जाणाऱ्या पैशांच्या राशी या सगळ्या गोष्टी कल्पनातीत आहेत. आपला मध्यमवर्गीय मराठी बाणा इथे आपल्याला रमू देत नाही हेच खरे. 'गड्या आपुला देश बरा', म्हणत शेवटी भारतात परतलो, तो सुंदर आठवणींचा कोपरा मनामध्ये जपून ठेवत!

❑❑❑

# निपुण भारत मिशन : विद्यार्थ्यांना प्रगत व निपुण करणारे धोरण

**स्वाती अहिरे**
श्री नृसिंह विद्यालय, चास
ता. जि. अहमदनगर.
भ्रमणध्वनी : ९५५२०३०९८९

*निपुण भारत (NIPUN BHARAT) कार्यक्रमाचा शुभारंभ व्हर्च्युअल पद्धतीने दि. ५ जुलै, २०२१ रोजी केंद्रीय शिक्षणमंत्री श्री. रमेश पोखरियाल निशंक यांच्या हस्ते झाला. निपुण भारत मिशन कार्यक्रम २०२० काय आहे, त्याबद्दल माहिती देणारा हा लेख.*

'बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९' (RTE Act 2009) लागू झाल्यापासून विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर अधिक भर देण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणाची हमी RTE Act - 2009 प्रमाणे समाजातील सर्व स्तरांवरील विद्यार्थ्यांना मिळत आहे. यामध्ये सर्व बालकांचा समावेश करण्यात आला आहे. आपण ज्या पद्धतीचे शिक्षण मुलांना देतो त्यावर देशाची प्रगती अवलंबून असते. नुकतेच केंद्र शासनाने NEP - 2020 राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० जाहीर केले, शिक्षणक्षेत्रातील एक महत्त्वाचा बदल आपल्याला राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० अंतर्गत दिसून येणार आहे. याच धर्तीवर केंद्र शासनाच्या शिक्षा मंत्रालयाने निपुण भारत मिशन हा कार्यक्रम सुरू केला आहे. या नवीन शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीचाच एक भाग म्हणजे केंद्र शासनाच्या 'समग्र शिक्षा' या योजनेअंतर्गत निपुण भारत मिशन कार्यक्रम (Nipun Bharat Mission Programme) सुरू करण्यात आला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागाने दि. २३ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयानुसार निपुण भारत अभियान सुरू केले आहे.

एकविसाव्या शतकातील पहिले नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० जाहीर करण्यात आले आहे. तब्बल ३४ वर्षांनंतर 'नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण' (NEP 2020) हे २९ जुलै, २०२० रोजी मंजूर करण्यात आले. या धोरणामध्ये अनेक आमूलाग्र बदल करण्यात आले आहेत. 'केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय' आता 'शिक्षण मंत्रालय' या नावाने ओळखण्यात येणार आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतातील नागरिकांची निरक्षरता दूर करण्यासाठी सातत्याने वेगवेगळे कार्यक्रम आखले जात आहेत. निपुण भारत मिशन (NIPUN BHARAT) National Initiative for Proficiency in Reading with Understanding and Numeracy म्हणजेच बालकांमध्ये मूलभूत वाचन, समज आणि संख्याज्ञान कौशल्ये विकसित करणे. मुलांना साक्षर बनविणे. मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान हेच निपुण भारत मिशन कार्यक्रमाचे लक्ष्य आहे. केंद्र शासनाने (NEP - 2020) नुसार मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान यांमध्ये प्रगत करण्यासाठीचा निपुण भारत कार्यक्रम, या योजनेचा शुभारंभ केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभाग यांच्यामार्फत संपूर्ण देशभरात केंद्रीय शिक्षणमंत्री श्री. रमेश पोखरियाल निशंक यांच्या हस्ते दृक्श्राव्य माध्यमाद्वारे दि. ५ जुलै, २०२१ रोजी करण्यात आला.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि. २७ ऑक्टोबर, २०२१ रोजी निपुण भारत अंतर्गत मूलभूत

साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्याबाबत निपुण भारत शासन निर्णय (NIPUN BHARAT) काढला.

निपुण भारत मिशन अंतर्गत कार्यक्रमात वय वर्षे ३ ते ९ या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान या कौशल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे.

निपुण भारत मिशन प्रोग्राम अंतर्गत FLN वर लक्ष केंद्रित केले गेले आहे. Foundational Literacy and Numeracy (FLN) याचाच मराठीत अर्थ मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान असा आहे.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हा सन २०१५ मधील कार्यक्रम संपूर्ण राज्यभर राबविण्यात आला. प्रत्येक मुलाने मूलभूत अध्ययन क्षमता प्राप्त करणे, कोणतेही मूल अभ्यासात मागे न राहणे हे सदर कार्यक्रमाचे मुख्य ध्येय होते. सन २०१४, २०१६ व २०१८ च्या ASER अहवालानुसार या कार्यक्रमास प्रचंड यश मिळाल्याचे दिसून येते. तथापि, कोविड–१९ च्या महामारीमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठ्या प्रमाणात अडथळा निर्माण झाला. युनेस्कोने केलेल्या अभ्यासानुसार या काळात विद्यार्थ्यांचा शालेय शिक्षणाचा ६५ ते ७४ टक्के वेळ वाया गेल्याचे दिसून आले. अझिम प्रेमजी विद्यापीठाने केलेल्या सर्वेक्षणातून केवळ ४२ टक्के मुले ऑनलाईन वर्गाला उपस्थित राहू शकली नाहीत. ऑनलाईन वर्गातदेखील मुलांना शिक्षण परिणामकारक मिळाल्याचे दिसून आले नाही. जवळपास ८० टक्क्यांपेक्षा अधिक शिक्षकांना विद्यार्थ्यांबरोबर ऑनलाईन भावनात्मक संपर्क ठेवणे कठीण गेले. ९० टक्क्यांपेक्षा अधिक शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन परिणामकारकरीत्या करणे शक्य झाले नाही. आशियाई विकास बँक २०२१ नुसार शाळा बंद राहिल्यामुळे ५ आशियाई देशांमधील मुलांच्या भावी सरासरी कमाईच्या ३.५ टक्के ते ४.७ टक्के नुकसान झाले, म्हणून सध्याची परिस्थिती लक्षात घेता मुलांना पायाभूत शिक्षण मिळणे गरजेचे आहे. त्यामुळे मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान कार्यक्रमाची गरज निर्माण झाली. नवीन प्रवेशित आणि प्राथमिक स्तरावरील मुलांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी तसेच नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी निपुण भारत अंतर्गत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मध्ये प्राथमिक स्तरावर सन २०२६–२७ पर्यंत मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्ये प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. युनेस्कोच्या अहवालानुसार अद्यापही बहुतेक प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांनी मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त केलेले नाही, असे सर्वेक्षणात दिसून आले आहे. यासाठी मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

वय वर्षे ३ ते ९ वयोगटातील सर्व विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी त्वरित एक राष्ट्रीय अभियान राबवून राज्यामध्ये अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. ही गरज लक्षात घेता मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियान (Fondational Literacy and Numeracy) निपुण भारत मिशन सुरू करण्यात आले आहे.

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० मध्ये FLN कार्यक्रमामध्ये पायाभूत साक्षरतेचे घटक भाषा व गणित यावर लक्ष असून निपुण भारत मिशन मूलभूत साक्षरता अभियान FLN हे पायाभूत साक्षरता शिक्षणाशी संबंधित आहे. पायाभूत साक्षरतेचे घटक पुढीलपामाणे :

(१) **मौखिक भाषा विकास :** लेखन व वाचनाची कौशल्ये विकसित करण्यासाठी मौखिक भाषेचा विकास महत्त्वाचा आहे.

(२) **उच्चारशास्त्राची जाणीव :** शब्दांची लय व ध्वनींची जाणीव या बाबींचा योग्य वापर होणे गरेजेचे आहे.

(३) **सांकेतिक भाषा/लिपी समजून घेणे :** यामध्ये छापील मजकुरांचे आकलन करण्याची क्षमता, अक्षरांचे ज्ञान, सांकेतिक भाषा, लिपी समजून घेणे, शब्द ओळखणे अभिप्रेत आहे.

(४) **शब्दसंग्रह** : मौखिक शब्दसंग्रह, वाचन/लेखन शब्दसंग्रह व शब्दांच्या विविध अर्थच्छटा.

(५) **वाचन व आकलन :** मजकुराचे वाचन करून अर्थ समजून घेणे, माहिती प्राप्त करणे व मजकुराचे स्पष्टीकरण करणे.

(६) **वाचनातील ओघवतेपणा :** मजकूर अचूकपणे व लयबद्ध पद्धतीने वाचणे, अभिव्यक्ती व आकलन.

(७) **लेखन :** अक्षरे व शब्द लिहिणे, अभिव्यक्तीसाठी लिहिणे याची क्षमता.

(८) **आकलन :** छापील मजकूर/पुस्तके यांमुळे आकलन कौशल्य विकसित होणे.

(९) **वाचन संस्कृती/वाचनाकडे कल :** यामध्ये विविध तऱ्हेची पुस्तके व इतर वाचन साहित्य वाचनाकडे कल असणे.

पायाभूत संख्या साक्षरता, संख्याज्ञान व गणितीय कौशल्ये यांविषयी असे सांगता येईल, की पायाभूत संख्या साक्षरता म्हणजे दैनंदिन प्रश्न सोडविण्यासाठी साध्या संख्यात्मक कल्पनांचा वापर करण्याची क्षमता.

- संख्या पूर्व व संख्या कल्पनेचा विकास, तुलना करण्याचे ज्ञान व कौशल्य, क्रमशः मांडणी करणे.
- आकृतिबंध/संरचना ओळखणे व त्याचे वर्गीकरण या बाबी प्राथमिक वर्गात गणित अध्ययनाचा पाया घालतात.
- संख्यापूर्व : गणन व संख्याज्ञान
- संख्या व संख्येवरील क्रिया : दशमान पद्धतीचा वापर
- संख्येवरील क्रियांवर प्रभुत्व संपादन करणे.
- गणन करणे : तीन अंकी संख्यांची बेरीज, वजाबाकी, गुणाकार व भागाकार या गणितीय क्रिया करण्याच्या पद्धती समजून घेणे व त्याचा उपयोग करणे.
- आकार व अवकाश यांबाबत समजून घेणे.
- तीन अंकी संख्यांपर्यंतची सोपी आकडेमोड करून त्यांचा विविध संदर्भातील दैनंदिन कार्यात उपयोग करणे.
- नमुना/संरचना : आकार व अवकाशातील वस्तू समजून घेण्यासाठी संबंधित शब्दसंग्रह शिकणे.

'निपुण भारत अभियान'चा मुख्य उद्देश व ध्येय खालीलप्रमाणे आहे :

निपुण भारत अंतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्ता तिसरीपर्यंत मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान कौशल्य सन २०२६-२७ पर्यंत प्राप्त करणे. केंद्र पुरस्कृत 'समग्र शिक्षा' अंतर्गत मुलांना शालेय शिक्षणामध्ये प्रवेश देणे व त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात टिकवून ठेवणे. शिक्षक प्रशिक्षण, अध्ययन-अध्यापन संदर्भ व ई-साहित्य विकसित करणे. सन २०२६-२७ पर्यंत प्राथमिक स्तरावरील मूलभूत भाषिक व गणितीय कौशल्ये प्राप्त करणे.

राज्यातील सर्व विद्यार्थ्यांचा भावी शिक्षणाचा पाया मजबूत करणे, राज्यात सन २०२६-२७ पर्यंत इयत्ता

तिसरीपर्यंतच्या १०० टक्के विद्यार्थ्यांना मूलभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी, तसेच इयत्ता तिसरीतून पुढे गेलेल्या तथापि, अपेक्षित क्षमता प्राप्त न करू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी 'निपुण भारत' अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यास शासनाने, मान्यता दिली आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागाने महाराष्ट्र राज्य, निपुण भारत शासन निर्णय दि. २७ ऑक्टोबर, २०२१ रोजी 'निपुण भारत' अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी शासनादेश निर्गमित केले आहेत.

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम (२००९) लागू झाल्यापासून सर्व मुलांना जवळच्या शाळेत गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळण्याची हमी आणि सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचविण्याचे लक्ष्य दिलेले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० जाहीर झाल्यापासून शिक्षणक्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल करणारी शिक्षणपद्धती आपणास पाहायला मिळणार आहे.

❑❑❑

**(पृष्ठ क्र. २८ वरून)**

जीवनमूल्ये विद्यार्थ्यांमध्ये वृद्धिंगत व्हावी, यासाठी कथाकथन, काव्यवाचन, वक्तृत्व असे प्रतिभा आणि प्रज्ञा विकासाचे उपक्रम आयोजित करावेत.

(५) शिक्षकांच्या आज्ञेचे पालन होईपर्यंत मार्गक्रमण थांबवावे.

(६) मुख्याध्यापक आणि शिक्षक–पालक संघाचे प्रमुख यांना सहलीत आग्रहाने सहभागी करून घ्यावे. विद्यार्थ्यांना मुक्तपणे भटकण्यास प्रतिबंध करावा. सेल्फी प्रतिबंध अनिवार्य करावा.

(७) ज्या ठिकाणी सहल नेत आहोत, तेथे पाळावयाच्या नियमांबाबत विद्यार्थ्यांना निघण्यापूर्वी कल्पना द्यावी. ज्यामुळे जोखमीविना आनंदाने सहली पार पडतील.

(८) परत आल्यानंतर अनुभव कथनाचा कार्यक्रम आयोजित करावा.

❑❑❑

**जानेवारी २०२३ अंकातील भाषिक खेळाचे उत्तर**

| | | |
|---|---|---|
| **ल** | गा | म |
| **जी** | व | न |
| **अ** | भ | य |
| **श** | र | द |
| **चे** | त | न |
| **न** | गा | रा |
| **रा** | व | ण |
| **प्र** | पा | त |
| **ता** | लु | का |
| **नि** | क | ष |
| **प्र** | सा | द |
| **ने** | ता | जी |
| **प** | रा | ग |
| **अ** | जि | त |
| **प्र** | ल्हा | द |
| **वि** | सा | वा |
| **ना** | ता | ळ |
| **वि** | रा | ज |

# शतायुषी 'फुलपाखरू'चा करूया शैक्षणिक महोत्सव

**पी. एम. काळे**
(प्राचार्य) श्रीमंत शिवाजीराजे इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनि. कॉलेज,
फलटण, जि. सातारा.
भ्रमणध्वनी : ९८२३२५७०६६

*शिक्षक बंधू-भगिनींनो, विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो, पालक व शिक्षणस्नेह्यांनो, तुम्हा सर्वांना एक आग्रहाचे आणि अगत्याचे निमंत्रण बरं का! अहो, तुम्हांला माहिती आहे का? 'फुलपाखरू' या कवितेने नुकतेच शतक पूर्ण केले आहे. गणेश हरी उर्फ ग. ह. पाटील यांची 'फुलपाखरू' ही कविता ऑगस्ट २०२२ मध्ये शतायुषी झाली. ऑगस्ट १९२२ च्या 'आनंद' या मासिकात ती प्रथम प्रकाशित झाली होती. या कवितेचा शतकमहोत्सव साजरा करायचा आहे, त्यानिमित्ताने थोडेसे...*

'फुलपाखरू' या कवितेने नुकतेच शतक पूर्ण केले आहे. गणेश हरी उर्फ ग. ह. पाटील यांची 'फुलपाखरू' ही कविता ऑगस्ट २०२२ मध्ये शतायुषी झाली. ऑगस्ट १९२२ च्या 'आनंद' या मासिकात ती प्रथम प्रकाशित झाली होती. या कवितेचा शतकमहोत्सव साजरा करायचा आहे, त्यासाठी सर्व शिक्षणप्रेमींना हे निमंत्रण. कुठे जाण्या-येण्याचा त्रास घ्यायचा नाही. जेथे असाल, तेथूनच एक विद्याप्रेमी व शिक्षणयोगी म्हणून सहभागी व्हायचे आहे. 'जहाँ से जागो वहाँ सवेरा.' 'जाग्या त्याथी सवार। 'जाग येईल ती सकाळ' समजून या उत्सवात सामील व्हा. तुम्हां सर्वांचे हार्दिक हार्दिक स्वागत! काय, एक अडचण आहे म्हणता? कसली अडचण? हं, आले लक्षात. तुमच्यापैकी काहींना ही कविता माहीत नाही किंवा कधीच वाचली, अभ्यासली नाही. चला तर मग, सर्वांसाठी ही कविता येथे आहे तशी देत आहे. पाहा. वाचा. तोंडपाठ करा. अभ्यासा. अगोदर ओळख असेल, तर पुनर्ओळखीचा आनंद घ्या.

### फुलपाखरू

*छान किती दिसते । फुलपाखरू ।।धृ.।।*
*या वेलीवर । फुलांबरोबर*
*गोड किती हसते । फुलपाखरू ।।१।।*
*पंख चिमुकले निळेजांभळे*
*हालवुनी झुलते फुलपाखरू ।।२।।*
*डोळे बारिक । करिती लुकलुक*
*गोल मणी जणु ते । फुलपाखरू ।।३।।*
*मी धरू जाता । येई न हाता*
*दूरच ते उडते । फुलपाखरू ।।४।।*

चला, वाचली ना कविता? झाला ना तिचा परिचय? झाली ना अडचण दूर? आपणां सर्वांच्या अजेंड्यावर आता एकच विषय- 'फुलपाखरू'चा शतकमहोत्सव (Centenary) साजरा करणे. यासाठी दर्जेदार व नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांची अशी मालिका तयार करायची, की ती टप्प्याटप्प्याने वर्षभर चालेल. शिक्षक बंधु-भगिनींनी विद्यार्थी वयोगटाप्रमाणे कृती कार्यक्रमाची (Action Plan) आखणी करायची आहे. सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शिक्षकांच्या सूचनेनुसार उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग घ्यायचा आहे. विद्यार्थी मित्रांनो, सर्व उपक्रमांचा रोख तुमच्यावर आहे. या उत्सवाचे टार्गेट ऑडियन्स तुम्ही आहात. शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्या सक्रिय कृतींच्या आविष्कारांचा मेळच या उत्सवाला महोत्सव बनवणार आहे. कोणत्या कृती करता येतील बरे? चला, आपण सर्व जण यावर विचार (Loud thinking) करूया. आपापली मते मांडूया. कल्पना सादर करूया. बघता बघता हा पाहा कृती आराखडा तयारही झाला.

- 'फुलपाखरू' या कवितेचे सामूहिक वाचन करणे, तिचे परिशीलन करणे.
- ती तोंडपाठ करणे.
- ती हावभावांसह गात-गात सादर करणे.
- तिचा काव्य वाचनात समावेश करणे.

- सामूहिक कविता गायन करणे.
- तिच्या आधारावर चित्रकला स्पर्धा घेणे.
- तिचे रसग्रहण करणे.
- पर्यावरणीय संदर्भात तिचे महत्त्व विशद करणे.
- 'माझी आवडती कविता : फुलपाखरू' या विषयावर निबंध स्पर्धा भरविणे.
- 'फुलपाखरू : एक बालकविता' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा घेणे.
- फुलपाखराच्या जीवनावस्थांचा अभ्यास करणे.
- जवळील उद्यानात जाऊन फुलपाखरांचे निरीक्षण करून त्याच्या नोंदी घेणे.
- ओरिगामी या जपानी कागद कलेतून यू-ट्यूबच्या आधारे फुलपाखरे बनविणे.
- विविध रंगांच्या व आकारांच्या फुलपाखरांच्या चित्रांचा संग्रह करणे.
- फुलपाखरांच्या छोट्या-मोठ्या चित्रांचा वापर करून एक कोलाज म्हणजे समूहचित्र बनविणे.
- फुलपाखरांच्या जीवनचर्येचा अभ्यास करणे.
- ही कविता शाळेच्या व घराच्या भिंतीवर समर्पक चित्रासह लावणे.
- शुद्धलेखनाच्या स्पर्धेत तिचा वापर करणे.
- टाकाऊ वस्तू उदा. तुटलेल्या माळेचे मणी, आईस्क्रीमचे वापरलेले लाकडी चमचे, वस्तूंच्या वेष्टनांचा पुठ्ठा, रंगीत कागद व रंग वापरून फुलपाखराचे मॉडेल तयार करणे.
- फुलपाखरांच्या जाती-प्रजातींची माहिती करून घेणे.
- फुलपाखराचे कार्य व त्याचे महत्त्व यांची नोंद घेणे.
- फुलपाखराचा जीवनकाल पाहणे.
- फुलपाखरांचे खाद्य काय, ते कसे मिळवले जाते इत्यादीची नोंद घेणे.
- 'फुलपाखरू' या विषयावर काव्यनिर्मिती कार्यशाळा घेणे.
- 'संवाद फुलपाखराशी' या विषयावर विद्यार्थ्यांना बोलते करणे.
- 'मी फुलपाखरू झालो तर...' या विषयातून विद्यार्थ्यांना भूमिका (Role Playing) साकारण्याचा अनुभव देणे.
- फुलपाखरू व मानव यांच्या जीवनाचा थोडक्यात तौलनिक अभ्यास करणे.
- वरील शक्य त्या उपक्रमांच्या पहिल्या तीन उत्कृष्ट सादरीकरणाचे एक छानसे प्रदर्शन भरविणे.

मित्रांनो, ही यादी काही पूर्ण होणारी नाही. आपण त्यात आणखी भर घालू शकता. प्रश्न आहे तो तुमच्या उत्साही सहभागाचा, सक्रिय सहभागाचा आणि मनापासून सहभागाचा! आपण तो द्याल व हा शैक्षणिक महोत्सव १०० टक्के यशस्वी कराल, अशी आशाही आणि अपेक्षाही आहे. त्यासाठी तुम्हां सर्वांना खूप खूप शुभेच्छा!

◈◈◈

'जीवन शिक्षण' हे मासिक, संचालक तथा संपादक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांच्यासाठी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगांव बु.।। सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१ येथे छपाई करून प्रकाशक तथा संचालक, कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.) यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर रोड, पुणे ४११ ०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक : कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.), संचालक

'Jeevan Shikshan' a monthly magazine owned by State Council of Educational Research and Training, Maharashtra, Pune printed at Runa Graphics, behind Trimurti Hospital, Vadgaon Bk., Sinhagad Road, Pune 411041 and published by Director, Kaustubh Diwegaonkar (I.A.S.) at State Council of Educational Research and Training, Maharashtra, 708, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune 411 030. Editor : Kaustubh Diwegaonkar (I.A.S.), Director



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथील इंग्रजी भाषा विभागामार्फत इयत्ता दुसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सेतू अभ्यास (ब्रीज कोर्स) विकसन कार्यशाळेचे आयोजन दि. ६ ते ८ फेब्रुवारी २०२३ दरम्यान करण्यात आले होते. याप्रसंगी राज्यभरातून इंग्रजी भाषा विषयतज्ज्ञ उपस्थित होते.



परिषदेच्या उर्दू भाषा विभागामार्फत इयत्ता दुसरी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी अध्ययन निष्पत्तीवर आधारित सेतू अभ्यास (ब्रीज कोर्स) निर्मिती कार्यशाळा दि. १३ ते १६ फेब्रुवारी २०२३ दरम्यान राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे येथे संपन्न झाली.




परिषदेच्या संशोधन विभागामार्फत दि. २१ फेब्रुवारी २०२३ रोजी राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन २०२२-२३ पारितोषिक वितरण समारंभ परिषदेचे संचालक मा. श्री. कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.) यांच्या हस्ते पार पडला.

Date of Publication 3 February 2023
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th February 2023
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

**'Registered'**

Reg. No. RNI - 14563/1957
Post Registration No.: PCW/063/2021-2023
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**




पत्रव्यवहाराचा पत्ता :
**संपादक, जीवन शिक्षण**
**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र**
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०–२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०–२४४७७०९०.
**ई मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

**प्रति** ______________________